पंचायत राज्य

गांधीजी



नवजीवन

पंचायत राज्य

लेखक

मो. क. गांधी

संकलनकार

रा. का. प्रभु

भाषांतरकार

त्र्यं. वि. पर्वते

नवजीवन प्रकाशन मंदिर

अहमदाबाद

प्रकाशकाचे निवेदन

अगदी योग्य वेळी हे पुस्तक तयार केल्याबद्दल श्री. रा. का. प्रभु यांचे आम्ही मन:पूर्वक आभार मानतो. 'इंडिया ऑफ माय ड्रीम्स', 'मोहनमाला', 'ट्रूथ इज गॉड', 'इव्हिल रॉट बाय दी इंग्लिश मीडियम'वगैरे गांधीजींच्या लेखांची जी संकलने त्यांनी पूर्वी केलेली आहेत, त्यामुळे गांधीजींच्या लेखनाच्या अभ्यासकांना त्यांचा चांगला परिचय आहे.

सन १९१५ साली हिंदुस्तानात परत आल्यापासून गांधीजी ग्रामपंचायतींच्या पुनरुज्जीवनाची मोठी गरज असल्याचे तीव्रतेने प्रतिपादन करत असत; ग्रामस्वराज्य याच मार्गाने प्रस्थापित होईल. खराखुरा हिंदुस्तान हा त्याच्या सात लाख खेडेगावांत सामावलेला आहे आणि देशाच्या जीवनात या खेडेगावांनी आपला योग्य तो हिस्सा उचलला नाही तर हिंदुस्तानला सांगण्यासारखा भविष्यकाळच उरणार नाही. ग्रामराज्याच्या त्यांच्या योजनेमध्ये ग्रामीण कार्याचे प्रत्येक क्षेत्र समाविष्ट होते ज्यायोगे प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण व स्वयांशासित बनेल, रहिवाशांच्या सर्व आवश्यक गरजा भागवील आणि अशा रितीने परस्परांच्या हितासाठी एकमेकांशी सहकार्याने निगडीत झालेली अशी लहान-लहान लोकसत्ताके एका मालिकेत गुंफून, त्यांच्या पायावर साऱ्या राष्ट्राचे जीवन भक्कमपणे उभे राहील. ग्रामीण सफाई व आरोग्य, ग्रामीण आहार व सुदृढपणा, दवापाण्याची मदत, खादी व इतर ग्रामोद्योगांवर उभारलेला अहिंसक ग्रामीण संसार, कला व कारागिरी, सहकार्याने केलेले पशुसंवर्धन व इतर कार्ये, पायाभूत शिक्षण आणि शांतिसेना या प्राथमिक साधनांच्या उपयोगाने खेडेगावांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल, असे गांधीजींचे मत होते.

गांधीजींनी घालून दिलेल्या मार्गाने देशाच्या कित्येक भागांत ग्रामीण पुनर्घटनेचे व विकसनाचे कार्य प्रगत होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. तथापि या कामाला आणखी वेग येण्यासाठी याहून जोरदार व अखंड प्रयत्न, सर्वोदयवादी कार्यकर्त्यांनी व्यक्तिश: आणि इतर सरकारी आणि बिनसरकारी संघटनांनी करण्याची गरज आहे. परकीय राज्य असताना अशा चळवळीचे पाऊल फारसे पुढे पडले नाही किंवा तिला गती मिळाली नाही हे उघड आहे.

आता परिस्थिती मूलत:च बदललेली आहे आणि आपल्या नियोजनकारांना प्रकर्षाने जाणवत आहे की जर आपला राष्ट्रीय संसार सुस्थिर करायचा असेल तर, ग्रामीण संसार सुप्रतिष्ठीत होणे ही अगदी प्राथमिक गरज आहे. ग्रामीण संसार अहिंसेच्या पायावर ब्रिटिश अंमल प्रस्थापित होण्यापूर्वी असा सुस्थिर झालेला होता आणि आता त्याचा अगदी विध्वंस होऊन खेडेगावे फार कठीण परिस्थितीत आहेत हे गांधीजींनी दाखवून दिले आहे. आपल्या मुख्य प्रधानांनी बरोबर सांगितले आहे की, आज आपल्या तीन गरजा अगदी मूलभूत स्वरूपाच्या आहेत. त्या म्हणजे (१) प्रत्येक खेड्यात पायाभूत शिक्षण देणारी एक शाळा, (२) ग्रामपंचायत, (३) ग्रामीण सहकारी संघटना. यांत आणखी एक चौथी भर टाकता येईल. ती म्हणजे प्रत्येक खेडेगावात एक परिश्रमालय स्थापणे. परिश्रमालय म्हणजेच हुन्नरशाळा. तेथे प्रत्येक गावकऱ्याला काम करता येईल व त्या कामाबद्दल योग्य मजुरी मिळेल आणि ग्रामीण उद्योग व कारागिरीच्या कामांमध्ये शिक्षण मिळेल. खरे स्वराज्य प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्यासाठी हा चतुरंग कार्यक्रम फार उपयुक्त ठरेल.

आम्हाला अशी आशा आहे की प्रस्तुत प्रकाशनाची, वाचकांना राष्ट्रपुनर्घटनेच्या या प्रमुख अंगाविषयी गांधीजींचे विचार काय होते हे समजून घेण्यास व त्यातून स्वहित करून घेण्यास मदत होईल. विशेष करून या प्रकाशनाच्या पहिल्याच प्रकरणात (पान ९ वर) गांधीजींनी काय म्हटले आहे त्याकडे वाचकांचे विशेष लक्ष आम्ही वेधू इच्छितो:

"दारिद्र्याने गांजलेला व लक्षावधी निरक्षरांनी भरलेला हिंदुस्तान मी चितारलेला नाही. त्याच्या प्रकृती धर्माला मानवेल अशा रीतीने सतत प्रगती करीत असलेल्या हिंदुस्तानाचे चित्रण मी स्वत:शी रंगविलेले आहे. तथापि आसन्नमरण झालेल्या पाश्चात्य सुधारणेची तिसऱ्या वर्गाची किंवा पहिल्या वर्गाची नक्कल करणे असे देखील माझे चित्र नाही."

या पुस्तकाची किंमत आम्ही शक्य तितकी कमी ठेवली आहे. या मराठी आवृत्तीपूर्वी आम्ही हिंदी आणि गुजराती आवृत्याही प्रसिद्ध केल्या आहेत.

ता. ३१-१-१९५९

अनुक्रमणिका

	प्रकाशकाचे निवेदन	३
१.	ग्रामसुधारणेची चळवळ का केली पाहिजे ?	७
२.	स्वातंत्र्यपूर्व काळातील पंचायती	१०
३.	स्वतंत्र हिंदुस्तानातील पंचायती	१२
४.	माझी ग्रामस्वराज्याची कल्पना	१५
५.	एक आदर्श ग्राम	१७
६.	अहिंसक ग्रामीण समाजरचना	१८
७.	सर्वांगीण ग्रामीण विकास	२१
८.	ग्रामसफाई	२४
९.	ग्रामीण औषधी मदत	२६
१०.	ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन	२९
११.	खेडेगावांत चरख्याचे स्थान	३१
१२.	इतर ग्रामोद्योग	३२
१३.	काँग्रेस मंत्रिमंडळांचे कर्तव्य	३५
१४.	सहकारी पशुपालन	३७
१५.	ग्रामीण प्रदर्शने	४०
१६.	लोकसेवक संघ	४२
१७.	समग्र ग्रामसेवा	४३
१८.	गावांतील शांतिदले	४६

१. ग्रामसुधारणेची चळवळ का केली पाहिजे?

ज्यांना शिक्षणाचा लाभ झाला त्यांनी हयगय केल्यामुळे खेडेगावांचे दीर्घकालीन नुकसान होत आले आहे. सुशिक्षितांनी शहरांत राहणे पसंत केले. अशांपैकी ज्यांना सेवावृत्तीची स्फूर्ती झालेली आहे त्यांना सेवा करता -करताच स्वत:च्या सामर्थ्याची अभिव्यक्ती शोधण्याला उद्युक्त करण्यासाठी हा ग्रामसुधारणा आंदोलनाचा यत्न आहे. सेवावृत्तीने जे खेडेगावी स्थायिक झाले आहेत, ते आपल्यापुढे उत्पन्न होणाऱ्या अडचणींनी गांगरून जात नाहीत. ग्रामीण जीवनाचा स्वीकार करण्यापूर्वीच त्यांना जाणीव असते की, आपल्यापुढे पुष्कळ अडचणी उपस्थित होतील आणि त्यातलीच एक अडचण म्हणजे आपल्या ग्रामीण बांधवांची उदासीनता किंवा बेफिकिरी. म्हणून ज्यांच्याकडे आत्मविश्वास आहे आणि ज्यांची अंगीकृत कार्यावर श्रद्धा आहे, असेच लोक ग्रामीण बांधवांची सेवा करतील आणि त्यांच्या जीवनावर परिणाम करतील. ग्रामीण जनतेमध्ये सदाचारी जीवन घालविणे हेच खुद्द एक प्रात्यक्षिक आहे आणि सभोवतालच्या परिस्थितीवर त्याचा परिणाम झाल्यावाचून राहणार नाही. केवळ उदरभरणासाठीच ज्या तरुणाला खेडेगावी जाण्याचा प्रसंग येतो, त्याची खरी अडचण ही आहे की तो सेवाभावी वृत्तीने तिथे जात नाही. जे पैसे मिळवण्याकरिताच तिकडे जातात, त्यांना आकर्षित करणारे खेडेगावात काही नाही हे मला मान्य करावे लागेल. सेवेचेच आकर्षण किंवा उत्तेजन असल्याशिवाय, पहिले-वहिले नावीन्य ओसरल्यावर ग्रामीण जीवन नकोसे वाटणारच. एखाद्या तरुणाने एकदा खेडेगावात पाऊल टाकल्यानंतर काही अडचणींना किंवा गैरसोयींना तोंड देण्याचा प्रसंग आल्यास ग्रामसेवेच्या आपल्या संकल्पापासून ढळू नये. दम धरून प्रयत्न केल्यास असे दिसून येईल की, नगरवासीयांपेक्षा ग्रामवासी काही वेगळे नाहीत आणि त्यांच्याकडे लक्ष दिले व त्यांच्याशी स्नेहाने वागले की तेही

आपल्याला प्रतिसाद देतात. देशात जे थोर लोक आहेत, त्यांच्याशी संपर्क साधण्याची संधी खेडेगावात कोणाला मिळणार नाही हे खरे आहे. पण ग्रामीण मनोवृत्तीत वाढ झाली म्हणजे पुढाऱ्यांना खेडेगावांना भेटी देणे व त्यांच्याशी जिवंत संबंध स्थापन करणे गरजेचे वाटू लागेल. त्यातूनही जे खरोखर सज्जन व श्रेष्ठ आहेत, त्यांचा सहवास त्यांच्या ग्रंथांमार्फत मिळू शकतो. चैतन्य, रामकृष्ण, तुलसीदास, कबीर, नानक, दादू, तुकाराम, तिरुवल्लुवार आणि असे अनेक यांच्यासारखेच विख्यात थोर सत्पुरुष आहेत ज्यांच्या ग्रंथांची सोबत आपल्याला नेहमीच होऊ शकते. खरी अडचण ही आहे की जी शाश्वत मूल्ये आहेत, त्यांचा स्वीकार करण्यासाठी मनाची एकतानता साधावयास हवी. आधुनिक स्वरुपाचे राजकीय, सामाजिक, अर्थिक, शास्त्रीय विचार समजून घ्यावयाचे असतील तर त्या जिज्ञासेचे समाधान करण्यासारखे वाङमय मिळू शकेल. मला कबूल आहे की धर्मिक वाङ्मय जितक्या सहजपणे मिळू शकेल तितक्या सहजपणे ते मिळणार नाही. सत्पुरुषांनी जे लिहिले, ते जनतेकरिता लिहिले. आधुनिक विचार भाषांतररुपाने त्यांना पटेल अशा रीतीने लोकांपुढे मांडण्याचा प्रघात अद्याप नीटसा सुरू झालेला नाही. पण यथाकाल तो झाल्यावाचून राहणार नाही. म्हणून तरुणांना माझा असा सल्ला आहे की त्यांनी धीर सोडू नये, कच खाऊ नये, आपले प्रयत्न चालू ठेवावे आणि आपल्या वास्तव्याने खेडेगावे वसतीलायक बनवावीत व त्यांच्याबद्दलचा लोभ वाढीला लावावा. ग्रामीण जनतेला पटेल अशा पद्धतीने खेड्यांची सेवा करून त्यांनी हे घडवून आणावे. आपल्या श्रमाने गाव अधिक स्वच्छ करून व आपल्या सामर्थ्यानुरुप निरक्षरतेचे खेडेगावातून उच्चाटन करून या सेवाकार्याला प्रारंभ करता येईल. जर या तरुणांचा जीवनक्रम शुद्ध, पद्धतशीर व उद्योगरत असा असेल तर, जेथे त्यांचे कार्यक्षेत्र आहे, तेथे या गुणांची पखरण होईल, याबद्दल शंका नाही.

हरिजन, २०-२-१९३७

माझे स्वप्न

दारिद्र्याने गांजलेला व लक्षावधी निरक्षरांनी भरलेला हिंदुस्तान मी चितारलेला नाही. त्याच्या प्रकृती धर्माला मानवेल अशा रीतीने सतत प्रगती करीत असलेल्या हिंदुस्तानाचे चित्रण मी स्वत:शी रंगविले आहे. तथापि आसन्नमरण झालेल्या पाश्चात्य सुधारणेची तिसऱ्या वर्गाची किंवा पहिल्या वर्गाची नक्कल करणे असेदेखील माझे चित्र नाही. माझे स्वप्न जर सफल झाले तर सात लाखांपैकी प्रत्येक खेडेगावात समाधानी जीवन घालविणारे लोकसत्ताक अवतरेल, त्याच्यामध्ये कोणी निरक्षर असणार नाही, कोणी निरुद्योगी, आळशी राहणार नाही, प्रत्येकाकडे काही ना काही उपयुक्त कामगिरी असेल, प्रत्येकाला पौष्टिक अन्न मिळेल, हवेशीर वसतिस्थाने असतील, शरीर आच्छादनासाठी भरपूर खादी मिळेल, सर्व ग्रामस्थ आरोग्याचे व स्वच्छतेचे नियम पाळतील. अशा राज्याच्या गरजा विविध व वर्धिष्णु असतील आाणि त्या त्या राज्याला पुरविणे भागच पडेल. तसे न झाल्यास त्याची जिवंतपणी हालचालच बंद पडली असे होईल.

मात्र माझ्या मते या राज्यांत इंग्रजांप्रमाणे इंग्रजी लिहिण्याचा व बोलण्याचा अशक्य प्रयत्न करीत राहिल्याने ज्यांची मने दुबळी होऊन गेली आहेत आणि घोकंपट्टीमुळे ज्यांचे मेंदू नि:सत्व झाले आहेत, अशा बी.ए. व एम.ए. लोकांची फौज असणार नाही. यांपैकी बहुसंख्यांना काही काम किंवा रोजगार असत नाही आणि जेव्हा त्यांना नोकरी मिळते तेव्हा मात्र ती कारकुनी कामाची असते. बारा वर्षे हायस्कूल व कॉलेजमध्ये घालवून त्यांनी जे ज्ञान संपादन केलेले असते त्याचा या कारकुनी कामांत काहीच उपयोग नसतो.

हरिजन, ३०-७-१९३८

२. स्वातंत्र्यपूर्व-काळातील पंचायती

पंचायत शब्दाला एक प्राचीन इतिहास आहे; हा एक चांगला शब्द आहे. त्याचा शब्दश: अर्थ असा की ग्रामस्थांनी पसंत केलेल्या पाच इसमांची सभा. हिंदुस्तानातील असंख्य ग्रामीण लोकसत्ताक राज्ये ज्या पद्धतीने चालवली जात त्या पद्धतीची पंचायत ही प्रातिनिधीक आहे. पण आपल्या निर्दय महसूल पद्धतीद्वारे या प्राचीन लोकसत्ताकांचा ब्रिटिश सरकारने जवळजवळ विध्वंस करून टाकला; महसूल वसुलीचा सपाटा त्यांना सोसण्यासारखा नव्हताच. या जुन्या पद्धतीचे पुनरुज्जीवन करण्याचा एक अर्धवट प्रयत्न गावांतील वृद्धांना दिवाणी व फौजदारी प्रकरणांत न्यायदानाचे थोडेसे हक्क देऊन, काँग्रेसवाले करू पाहत आहेत. १९२१ साली प्रथम हा यत्न झाला. तो फसला. आता पुन्हा यत्न करू पाहण्यात येत आहे. परंतु तो जर पद्धतशीरपणे आणि प्रामाणिकपणे केला गेला नाही तर पुन्हा फसेल; शास्त्रशुद्ध रीतीनेच तो करावयास हवा असेच मला खरोखर म्हणावयाचे होते.

नैनिताल येथे मला असे सांगण्यात आले की, संयुक्त प्रांतांत* कित्येक ठिकाणी बलात्काराच्या गुन्ह्यांसारख्या फौजदारी गुन्ह्यांची सुनावणीदेखील या असल्या पंचायतीसमोर होत असते. मी ऐकले की काही अज्ञ किंवा पक्षपातींनी काही विलक्षण निवाडे दिले. हे जर खरे असले तर फारच वाईट आहे. असल्या कुचकामी पंचायती आपल्याला न पेलणाऱ्या जबाबदाऱ्यांच्या भाराने कोलमडून पडल्याच पाहिजेत. म्हणून माझी सूचना अशी आहे की पुढे दिलेले नियम ग्रामसेवकांनी मार्गदर्शनाकरिता ध्यानात घ्यावेत:

१. प्रांतिक काँग्रेस समितीच्या लेखी मंजुरीशिवाय एकही पंचायत

---

*आजचा उत्तर प्रदेश

स्थापन करू नये.

२. गावांत प्रथम दवंडी पिटून, जाहीर सभा घेऊन, तिचा उद्देश सर्वांना जाहीर करून नंतर पंचायत निवडण्यात यावी.

३. तिची शिफारस तहसील (तालुका) कमिटीने करावी.

४. अशा पंचायतीकडे फौजदारी कामे चालविण्याचा अधिकार असू नये.

५. पक्षकारांनी स्वखुषीने आपले दावे पंचायतीकडे फैसला करण्यासाठी दिले तरच पंचायतीने त्याबद्दल निवाडा द्यावा.

६. पंचायतीकडे कोणतेही वादग्रस्त प्रकरण सोपविण्याची कोणावरही सक्ती होऊ नये.

७. एकाही पंचायतीला दंड करण्याचा अधिकार असू नये. दिवाणी दाव्यांमध्ये पंचायतीचे खरे बळ म्हणजे तिचा नैतिक अधिकार, नि:पक्षपातीपणा आणि पक्षकारांची स्वखुशीने मान्यता होय.

८. बहिष्काराचा, वाळीत टाकण्याचा असा प्रकार होऊ नये.

९. प्रत्येक पंचायतीने पुढील गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे: (अ.) गावांतील मुला- मुलींचे शिक्षण, (आ.) आरोग्य, (इ.) औषध-पाण्याची तजवीज, (ई.) गावांतील विहिरी व तळी स्वच्छ राखणे, (उ.) अस्पृश्य समजल्या जाणाऱ्यांच्या दैनंदिन गरजा व त्यांचा उद्धार.

१०. कलम ९ मध्ये उल्लेखलेल्या शर्तींचे पालन ज्या पंचायतीला सहा महिन्यांच्या मुदतीत करता येणार नाही, अथवा इतर काही कारणांमुळे ग्रामस्थांची तिच्यावर गैरमर्जी झाली असेल अथवा अन्य काही कारणाने ती निषेधार्ह ठरली असेल आणि अशी कारणे प्रांतिक काँग्रेस कमिटीला पुरेशी ताकदीची वाटत असतील तर असली पंचायत बरखास्त करावी आणि तिच्या जागी नव्या पंचायतीची निवड करावी.

सुरुवातीच्या काळात दंड करण्याची अथवा सामाजिक बहिष्कार पुकारण्याची सत्ता पंचायतींना नसणे अगदी आवश्यक आहे. अज्ञ अथवा दुष्ट माणसांच्या हाती बहिष्काराचे अधिकार म्हणजे धोकादायक हत्यार

असल्याचे आढळले आहे. दंड फर्मावण्याच्या अधिकाराचे पर्यवसानही भलतेच नुकसान पोहोचविण्यात होण्याची शक्यता आहे. कलम ९ मध्ये सुचविल्याप्रमाणे कार्य केल्याने एखादी पंचायत लोकमान्य झाली अथवा तिची लोकप्रियता वाढली म्हणजे तिच्या नैतिक वजनानेच तिचे निवाडे व तिचा अधिकार यांचा मान राखला जाईल. कोणाचेही खरे सामर्थ्य खरोखर यातच आहे आणि ते कधीही कोणालाही हिरावून घेता येण्यासारखे नाही.

यंग इंडिया, २८-५-१९३१

३. स्वतंत्र हिंदुस्तानातील पंचायती

स्वातंत्र्य याचा अर्थ हिंदुस्तानच्या लोकांचे स्वातंत्र्य असा असला पाहिजे. आज त्यांच्यावर जे सत्ता (राजकीय) गाजवीत आहेत, त्यांचे स्वातंत्र्य नव्हे. आपल्या अमलाखाली जे आहेत, त्यांच्या इच्छेवर सत्ताधाऱ्यांनी अवलंबून राहिले पाहिजे. म्हणून लोकांची इच्छा अमलात आणण्यास, त्यांची सेवा करण्यास त्यांनी सिद्ध असले पाहिजे.

स्वातंत्र्याची सुरुवात अगदी तळापासून झाली पाहिजे. म्हणून प्रत्येक ग्राम म्हणजे सर्वसत्ताधीश असे एक लोकसत्ताक किंवा पंचायत झाले पाहिजे. यावरूनच सहजच असे अनुमान होते की प्रत्येक ग्राम हे स्वयंपूर्ण आणि आपला सर्व कारभार चालविण्यास समर्थ असले पाहिजे; वेळ पडली तर सगळ्या दुनियेला तोंड देऊन आपले रक्षण करण्यास देखील ते समर्थ असले पाहिजे. बाहेरून होणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार करून स्वसंरक्षण करण्याच्या यत्नांत नष्ट होऊन जाण्याची तयारी व्हावी असे वळण गावाला लावण्यात यावे म्हणजे प्रत्येक व्यक्ती हाच अखेर गावाचा किमान घटक होईल. म्हणजे शेजाऱ्यांनी किंवा जगाने केलेली मदत झिडकारावी किंवा तिच्यावर अवलंबून राहू नये असे नाही. परस्परांच्या सामर्थ्याचा तो खुषीचा व स्वायत्त खेळ होईल, असा समाज निश्चितच फार

सुसंस्कृत असेल. त्याचे घटक असणाऱ्या स्त्री-पुरुषांना आपल्याला काय हवे ते समजेल. विशेष म्हणजे असे की त्यांना हे जरूर समजेल की समान श्रम केल्याशिवाय जे दुसऱ्यांना मिळत नाही, ते आपल्यालाही मिळू नये.

साहजिकपणेच असा समाज हा सत्याच्या व अहिंसेच्या आधारावर उभारला जाईल. ईश्वरावर दृढ विश्वास असल्याशिवाय सत्याला व अहिंसेला जागा नाही. ईश्वर म्हणजे एक स्वयंभू, सर्वज्ञ, सर्वव्यापी शक्ती आहे; ती इतर सर्व शक्तींना व्यापून राहते आणि इतर सर्व शक्ती नाहीशा झाल्या किंवा आपले कार्य करीत नाहीशा झाल्या तरी ही शक्ती विद्यमान असणारच. अशा सर्वस्पर्शी जिवंत शक्तीवर श्रद्धा असल्याखेरीज माझ्या स्वत:च्या जीविताचे कारण किंवा हेतू काय हेच मला सांगता येणार नाही.

असंख्य खेडेगावांनी बनलेल्या या रचनेमध्ये अधिकाधिक रुंदावत जाणारी, उंचावत जाणारी नव्हे, अशी वर्तुळे असतील. जीवन म्हणजे एका भक्कम पायावर उभारलेला टोकाला निमुळता होत गेलेला पिरामिड नव्हे. उलटपक्षी ते एक सागरासारखे विस्तीर्ण वर्तुळ आहे. त्याचा मध्यबिंदू म्हणजे व्यक्ती जी आपल्या ग्रामसमूहासाठी मरण्यास सिद्ध असेल आणि असे गाव त्याच्या भोवतालच्या ग्रामसमूहासाठी मरण्यास सिद्ध असेल. सरतेशेवटी या सर्व व्यक्तींचे जीवन हे एकरुपी होईल, त्यामध्ये अभिमान किंवा आक्रमक वृत्ती असणार नाही. त्या सर्व व्यक्ती विनम्र असतील आणि एका विस्तीर्ण वर्तुळाचे महत्त्वाचे घटक म्हणून त्यांना समान भव्यता लाभेल.

यामुळे असे होईल की अगदी शेवटच्या परीघालादेखील त्याहून लहान असणाऱ्या परीघांनी व्याप्त अशा वर्तुळांच्या चिरडण्याची शक्ती असणार नाही; उलट त्याचे सामर्थ्य त्याला वाढविताच येईल आणि त्याचे स्वत:चे सामर्थ्य तर मध्यबिंदूपासूनच आलेले असेल. मला कोणी खिजवून असे म्हणेल की हे सगळे हवेतील ध्येयवादी बोलणे आहे आणि म्हणून त्याकडे मुळीच लक्ष देण्याचे कारण नाही. युक्लिडच्या बिंदूला जर अमर्त्य अशी किंमत असेल तर, मनुष्यजातीचे जीवन सुकर व्हावे म्हणून मी काढलेल्या

चित्राचीही तशीच किंमत आहे. हे चित्र जरी सर्वस्वी साकार झाले नाही तरी हिंदुस्तानने त्याकरिता आपला जीव पाखडावा. आपणास काय हवे याची संपूर्ण कल्पना देणारे चित्र आपण काढलेच पाहिजे. तरच त्याच्याशी शक्य तितके जास्त जमणारे चित्र आपण प्रत्यक्ष व्यवहारात उतरवू शकू. हिंदुस्तानात प्रत्येक ग्राम हे जर खरे लोकसत्ताक व्हावयाचे असेल तर माझेच चित्र सनातन आहे असा माझा दावा आहे, कारण त्यात प्रथम व अंतिम हे समान आहेत किंवा निराळ्या शब्दांत मांडावयाचे म्हणजे त्यात कोणी प्रथम नाही व कोणी अंतिम नाही.

या चित्रात प्रत्येक धर्माला हवी तेवढी व समान जागा आहे. ज्याची मुळे जमिनीच्या पोटात खोलवर गेलेली आहेत, अशा एका भव्य वृक्षाची आपण सर्व केवळ पाने आहोत. त्याचा बुंधा कधी हलणार नाही, कितीही सोसाट्याचा वारा आला तरी त्याने तो उन्मळून पडणार नाही.

जी यंत्रे माणसांना बेकार करतात अशा यंत्रांना या चित्रात जागा नाही. असली यंत्रे काही माणसांच्या हाती सत्ता केंद्रीत करतात. संस्कारसंपन्न मानवी कुटुंबात श्रमाला उच्च असे स्थान आहे. जे यंत्र प्रत्येक व्यक्तीला मदत करील त्याला या चित्रात जागा आहे. परंतु मला कबूल केले पाहिजे की असे यंत्र कोणते याचा नीट स्वस्थपणे बसून मी विचार केलेला नाही. सिंगरच्या शिवणाच्या यंत्राचा विचार मी केला, पण मला ते टाकाऊ वाटते. माझ्या चित्राला पूर्तता येण्यासाठी मला त्याची गरज वाटत नाही.

हरिजन, २८-७-१९४६

जेव्हा पंचायत राज्याची स्थापना होईल तेव्हा हिंसेने (जबरदस्तीने) जे करता येणार नाही ते लोकमत घडवून आणील. जोपर्यंत सामान्य जनतेला आपल्या सामर्थ्याची जाणीव होत नाही तोपर्यंतच जमीनदार, भांडवलदार आणि राजे आपले वर्चस्व गाजवू शकतील. जमीनदारी अथवा भांडवलशाहीबरोबर जर सामान्य लोक असहकार पुकारतील, तर या पद्धती निकामीपणामुळेच नामशेष होतील. पंचायत राज्यात फक्त

पंचायतीचेच हुकूम मानले जातील आणि स्वत: केलेल्या कायद्यांना अनुसरूनच पंचायतींचा कारभार चालेल.

हरिजन, १-६-१९४७

४. माझी ग्रामस्वराज्याची कल्पना

ग्रामस्वराज्याची माझी कल्पना अशी, की ते एक स्वयंपूर्ण लोकसत्ताक असावे. अगदी गरजेच्या वस्तूंसाठी त्याने आपल्या शेजाऱ्यांच्या तोंडाकडे पाहता कामा नये, परंतु इतर पुष्कळ गरजा भागविण्यासाठी मात्र त्याला दुसऱ्यांकडे जावे लागेलच. असे पाहिले म्हणजे प्रत्येक गावाने स्वत:च्या योगक्षेमापुरते धान्य पैदा केले पाहिजे व वस्त्रप्रावरणाची गरज भागण्याइतका कापूस पिकवला पाहिजे. गावांतील गुराढोरांना वैरणही त्याच्यापाशी शिल्लक पाहिजे, करमणुकीची व्यवस्था पाहिजे आणि मुलांना व थोरांना खेळण्यासाठी मोकळ्या जागा पाहिजेत. जास्त जमीन उपलब्ध असेल तर तिच्यामध्ये उपयुक्त अशी पैसा देणारी पिके काढता यावीत. परंतु गांजा, तंबाखू, अफू वगैरे पिकांचा त्यात समावेश नसावा. गावाने एक नाट्यगृह, एक शाळा व एक सभागृह चालविले पाहिजे. सगळ्या गावाला पाणी पुरवठा करण्याचीही तजवीज पाहिजे. विहिरी व तळी चांगल्या रीतीने राखून हे होऊ शकेल. प्राथमिक पायाभूत अभ्यासक्रमाइतके शिक्षण सक्तीचे असले पाहिजे. सहकारी पायावर होता होईतो सर्व कामे चालली पाहिजेत. कमी अधिक प्रमाणात अस्पृश्यता पाळणाऱ्या हल्लीच्या प्रकारचा जातिभेद त्यात असणार नाही. ग्रामस्थांच्या हाती असलेली निर्वाणीची शस्त्रे म्हणजे असहकार आणि सत्याग्रहाची प्रक्रिया जिच्यामध्ये समाविष्ट आहे अशी अहिंसा. ग्रामरक्षणासाठी एक स्वयंसेवक दल सक्तीने उभारले पाहिजे. नोंद करून ठेवलेल्या स्वयंसेवकांना आळीपाळीने या कामासाठी निवडण्यात यावे. ठरलेली व किमान पात्रता असलेल्या स्त्री-पुरुषांमधून दरवर्षी पंचायत निवडली जावी

व गावाचे शासन तिने करावे. या पंचायतीकडे जरूर ते सर्व अधिकार व सत्ता असेल. हल्लीच्या ठरीव अर्थाने शिक्षा फर्मावण्याची पद्धतच राहणार नाही. त्यामुळे या पंचायतीकडे कायदेकानूह करणे, न्याय-मनसुबा करणे व त्यांची अंमलबजावणी ही सर्वच कामे पंचायत एक वर्ष आपल्या हुद्यावर असेपर्यंतच राहतील. कोणत्याही खेडेगावाला अशा तऱ्हेचे लोकसत्ताक बनता येईल व कोणालाही त्याच्या कामांत हात घालता येणार नाही. सध्याच्या सरकारलादेखील काही ढवळाढवळ करता येणार नाही. कारण त्याचा संबंध गावांचा महसूल वसूल करण्यापलिकडे येतच नाही. एखादे केंद्र असले तर त्याच्याशी किंवा शेजारच्या गावांशी या लोकसत्ताक ग्रामांचे संबंध कसे असतील याची चर्चा मी येथे केलेली नाही. माझा हेतू ग्रामस्वराज्याची रुपरेखा आखणे एवढाच आहे. वैयक्तिक स्वातंत्र्याच्या पायावर आधारलेली पूर्ण लोकशाही येथे आहे. प्रत्येक व्यक्ती आपल्या स्वत:च्या शासनाची संयोजक होऊ शकते. अहिंसेच्या कायद्याने त्याचे व त्याच्या शासनसंस्थेचे नियंत्रण होईल. व्यक्तीला व त्या व्यक्तीच्या ग्रामराज्याला सगळ्या जगाची पर्वा करण्याचे कारण नाही. कारण प्रत्येक व्यक्तीवर व तिच्या गावावर अधिसत्ता गाजवणारा कायदा एकच आहे आणि तो म्हणजे स्वत:च्या व स्वत:च्या ग्रामराज्याच्या रक्षणासाठी मृत्यूला कवटाळण्यास तो सदैव सिद्ध असेल.

या चित्रणामध्ये मूलत: अशक्य असे काही नाही. असे नमुनेदार ग्रामलोकसत्ताक निर्माण करणे कदाचित एखाद्याला आयुष्यभर पुरणारे काम ठरेल. खऱ्या लोकसत्तेचे प्रेम असणाऱ्या कोणीही व्यक्तीने एखादे खेडेगाव निवडावे, तेच आपले विश्व समजावे व त्याच कामाला वाहून घ्यावे म्हणजे अशा व्यक्तीला चांगले परिणाम झालेले आढळून येतील. सुरुवातीलाच गावातील भंगी, कातणारा, पहारेकरी, वैद्य व शिक्षक इतकी कामे त्या व्यक्तीला सांभाळावी लागतील. जर त्याच्या वाऱ्याला कोणी उभा राहिलाच नाही तर त्याने भंगीकाम व कापूस कातण्याचे काम

करण्यावर समाधान मानले पाहिजे.

हरिजन, २६-७-१९४२

५. एक आदर्श ग्राम

भारतातील आदर्श ग्रामाची रचना अशा रीतीने झाली पाहिजे की ज्यामध्ये सार्वजनिक स्वच्छता पूर्णपणे नांदली पाहिजे. गावापासून पाच मैलांच्या आत मिळणाऱ्या सामानाच्या मदतीनेच हवा व प्रकाश ज्यात उत्तम रीतीने खेळत आहे अशा झोपड्या गावात बांधल्या गेल्या पाहिजेत. या झोपड्यांच्या आजूबाजूला अशी मोकळी जागा असली पाहिजे जिथे गायीगुरांना राहायला जागा मिळून स्वत:च्या उदरनिर्वाहाला लागणाऱ्या भाजीपाल्याची पैदास करता आली पाहिजे. गावातील गल्लीबोळांत व रस्त्यावर धूळ साचलेली असता कामा नये. सर्वांच्या गरजा भागतील इतक्या व सर्वांना खुल्या अशा विहिरी असल्या पाहिजेत. सर्वांसाठी प्रार्थनागृहे, सार्वजनिक सभेसाठी जागा, सार्वजनिक गुरचरणासाठी कुरण, एक सहकारी दुग्धसंस्था, ज्यात उद्योगहुनर शिकवण्याची मुख्य तजवीत आहे अशी प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची शाळा पाहिजे आणि तंटेबखेडे मिटविण्यासाठी पंचायती पाहिजेत. या गावाने स्वत:ला लागणारा दाणा-गोटा, भाजीपाला, फळफळावळ आणि खादी स्वत: तयार केली पाहिजे. स्थूलमानाने आदर्श खेडेगावांची माझी ही कल्पना आहे. सध्याच्या परिस्थितीत येथील घरे प्राय: अशीच राहतील; काही किरकोळ सुधारणा त्यात होऊ शकतील. जर एखाद्या गावात चांगला जमीनदार असला अथवा लोकांमध्ये चांगले सहकार्य नांदत असेल तर सरकारची मदत घेतल्याशिवाय, जमीनदार व लोक यांना परवडेल इतक्या खर्चात, आदर्श घरांचा कार्यक्रम वगळून बाकीचा सगळा कार्यक्रम अंमलात आणता येईल. जर परस्परांशी सहकार्य करण्याची तयारी असेल तर खुद्द ग्रामस्थांनाच स्वत:च्या प्रगतीसाठी काम करता येईल, इतकेच मला तूर्त

पहावयाचे आहे. जर चांगले समजूतदार मार्गदर्शन असेल तर, माझी खात्री आहे की त्यांना गावाचे सामुदायिक उत्पन्न दुपटीने वाढवता येईल, प्रत्येकाचे वैयक्तिक उत्पन्न दुपटीने वाढेल, असे मात्र नाही. व्यापारासाठी नव्हे, पण स्थानिक कामकाजासाठी, प्राय: प्रत्येक बाबीसाठी गावामध्ये कधीही न संपणारी अशी सुप्त संपत्ती आहे. परंतु आपली स्थिती सुधारावी असे वाटत असल्याचे आशेचे चिह्न कोठे निदर्शनास येत नाही ही मोठीच दुर्दैवाची गोष्ट आहे.

ग्रामसेवकाला प्रथम जी समस्या सोडवायची आहे ती म्हणजे सार्वजनिक सफाईची. शारीरिक स्वास्थ्य बिघडविणारे आणि रोगराई पसरविणारे असे जे प्रश्न कार्यकर्त्यांची मति कुंठित करून सोडतात त्यांतील सर्वात दुर्लक्षिलेला असा हा सार्वजनिक सफाईचा प्रश्न आहे. ग्रामकार्यकर्ता जर झाडूकामकरी बनेल तर तो गावांतील सर्व मैला एकत्र गोळा करील आणि त्याचे खत बनवील आणि गावचे रस्ते साफ ठेवील. रोजचे शरीरधर्म कोठे व कसे उरकावे याबद्दल तो लोकांना सांगेल, सार्वजनिक सफाईच्या महत्त्वाचे विवेचन करील आणि तिच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे किती इजा व हानी होण्याचा संभव आहे हे समजावून सांगेल. ग्रामस्थ आपल्या सांगण्याकडे लक्ष देतात किंवा नाही हे न पाहता तो आपले अंगीकृत कार्य करीतच राहील.

हरिजन, ९-१-१९३७

६. अहिंसक ग्रामीण समाजरचना

कारखानदारी सुधारणेच्या पायावर अहिंसेची स्थापना करता येणार नाही. पण स्वयंपूर्ण गावांमध्ये अहिंसा चांगली नांदेल. ग्रामीण संपत्त्युत्पादनाची माझी जी कल्पना आहे, तिच्यामध्ये शोषणाला मुळीच वाव नाही. आणि शोषण हे तर हिंसेचे सर्वस्व आहे. म्हणून अहिंसक होण्यापूर्वी ग्रामीण बनणे आवश्यक आहे आणि ग्रामीण मनोवृत्ती अंगी

बाणवण्याकरिता चरख्यावर श्रद्धा असलीच पाहिजे.

हरिजन, ४-११-१९३९

अगदी काटेकोर, तर्कशुद्ध पद्धतीने बोलायचे म्हणजे कोणतीही क्रिया किंवा उद्योग थोडी तरी हिंसा केल्याशिवाय शक्यच होणार नाही, मग कितीही लहान का असेना. खुद्द आपली जगण्याची क्रिया ही देखील थोड्या बहुत हिंसेशिवाय अशक्य होईल. आपल्याला जे करावयाचे आहे ते एवढेच आहे की अशी हिंसा अगदी किमान, कमीत कमी व्हावी. खरोखर अहिंसा या नकारात्मक शब्दाचा अर्थच असा की जीवनामध्ये जी हिंसा अटळ आहे, तिचा त्याग करण्याचा प्रयत्न. म्हणून ज्याचा अहिंसेवर विश्वास आहे त्याने अशाच कामकाजांमध्ये गढून गेले पाहिजे ज्यात शक्य तितकी कमी हिंसा घडेल. अहिंसेवर मनापासून श्रद्धा असल्याखेरीज हे शक्य होणार नाही. समजा असा एक मनुष्य आहे जो प्रत्यक्ष हिंसा मुळीच करीत नाही, स्वत:ची भाकरी मिळविण्यासाठी कष्ट करतो, परंतु इतर लोकांची संपत्ती अथवा भरभराट पाहून तो सारखा मत्सराने जळत आहे. असा मनुष्य अहिंसक म्हणता येणार नाही. अहिंसक उद्योग किंवा काम याचा अर्थ असा की ज्यात मूलत:च हिंसेला स्थान नाही, ज्यामध्ये दुसऱ्याच्या श्रमाचे अथवा श्रमफलाचे शोषण नाही आणि इतरांचा मत्सर करण्यालाही वाव नाही.

माझ्याजवळ कोणताही ऐतिहासिक पुरावा नाही. परंतु मला असे वाटते की, हिंदुस्तानात एक काळ असा होता की ग्रामांचे संपत्त्युत्पादन व विभाजन हे अहिंसक अशा उद्योगांवर संघटित झालेले होते; मनुष्यमात्राच्या हक्कांवर आधारलेले नव्हे, तर त्याच्या कर्तव्यावर. अशा उद्योगांत जे गुंतलेले असत त्यांचा चरितार्थ चालत असेच, पण त्यांचा उद्योग हा त्यांच्या शेजाऱ्यांच्या हितासाठी चालत असे. उदाहरणार्थ, सुताराचा उद्योग हा शेतकऱ्याच्या गरजा भागविणारा असे. त्याला रोख पैसा मिळत नसे, पण त्याचा चरितार्थ ग्रामस्थ एक जिन्नस देऊन चालवीत. यातही काही

अन्याय होतच नसेल असे नाही, पण तो कमीत कमी असे. काठेवाडात साठ वर्षांपूर्वी काय व्यवस्था होती याचे खुद्द मला जे ज्ञात आहे त्यावरून मी बोलतो. हल्लीपक्षा त्यावेळी लोकांच्या डोळ्यांत जास्त तेज दिसे व त्यांच्या कर्मेंद्रियांमध्ये अधिक चपलता (जिवंतपणा) होती. ते जीवन अहिंसेवर आधारलेले होते, मात्र आपण अहिंसक आहो अशी जाणीव लोकांना नव्हती.

या सर्व हुन्नरउद्योगांत शारीरिक श्रम ही प्रमुख गोष्ट होती आणि मोठ्या प्रमाणावर यंत्रसामुग्री वापरली जात नसे. कारण दुसऱ्याच्या श्रमाचे शोषण त्याला करताच येत नव्हते. हस्त व्यवसाय असे आहेत की त्यांत गुलामगिरी व शोषण यांना अवकाशच मिळत नाही. मोठ्या प्रमाणावरील यंत्रसामुग्रीच्या उपयोगाने एकाच माणसाच्या हाती संपत्ती केंद्रीत होते आणि त्याच्यासाठी जे श्रम करतात त्यांच्यावर तो वर्चस्व मिळवतो.आपल्या कामकऱ्यांसाठी तो कामाच्या क्षेत्रातील परिस्थिती उत्तम ठेवण्याचा प्रयत्न करीत असेल, परंतु यामुळे शोषणक्रिया थांबत नाही आणि शोषण हे हिंसेचे एक स्वरूप आहे.

मी जेव्हा म्हणतो की, एकेकाळी समाजरचना ही शोषणावर नव्हे, तर न्यायावर उभारलेली होती, तेव्हा माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की सत्य व अहिंसा हे वैयक्तिक सद्‌गुण नव्हते; सर्व समाजच त्याचे परिपालन करीत असे. माझ्या दृष्टीने सद्‌गुण जर केवळ व्यक्तिगतच असतील अथवा संरक्षित व सुरक्षित परिस्थितीतच माणसे सद्‌गुणी राहतील तर त्या सद्‌गुणांना काहीच किंमत नाही; तशा अवस्थेत ते सद्‌गुण नव्हेतच.

हरिजन, १-९-१९४०

७. सर्वांगीण ग्रामीण विकास

माझ्या कल्पनेतील प्राथमिक ग्राम हे अगदी बलिष्ठांमध्ये बलिष्ठ असे असेल. माझ्या काल्पनिक ग्रामाची लोकसंख्या १००० असेल. स्वयंपूर्णतेच्या पायावर जर ते चांगले संघटित केले गेले तर अशा ग्रामाला नमुनेदार कामगिरी करून दाखविता येईल.

हरिजन, ४-८-१९४६

गावांतील लोकांनी आपण तयार करीत असलेल्या वस्तू इतक्या सुबक कराव्या व त्यांत इतके प्राविण्य मिळवावे की त्यांना बाहेर चांगली मागणी आलीच पाहिजे. आपली खेडेगावे चांगल्या रीतीने विकसित झाली म्हणजे कलानैपुण्य वा कारागिरी उत्तम प्रकारे संपादन केलेल्या लोकांचा तुटवडा कधीच जाणवणार नाही. गावांतच कवी, कलाकार, रचनाकार, भाषातज्ञ, संशोधक सर्व काही असतील. थोडक्यात सांगायचे तर जीवनात हवीशी वाटणारी कोणतीही गोष्ट खेडेगावांत नाही असे होणार नाही. हल्ली ही गावे म्हणजे नुसते उकिरडे झाले आहेत, पण उद्या तीच नंदनवनातील छोटे-छोटे बगिचे बनतील आणि तेथे हुशार, शहाणे लोक वसती करतील, असे की ज्यांना कोणी फसवू शकणार नाही की लुबाडू शकणार नाही.

अशा प्रकारे खेड्यांची पुनर्घटना करण्याला प्रारंभ आताच झाला पाहिजे. हे पुनर्घटनेचे काम हंगामी स्वरुपाचे असता कामा नये, कायम स्वरुपाचे पाहिजे.

कारागिरी धंदे, कला, आरोग्य, शिक्षण या सगळ्या गोष्टींचा एकत्र विचार करून योजना आखली पाहिजे. नई तालीम योजनेमध्ये या चारही बाबींचे मीलन सुंदर रीतीने झाले आहे आणि गर्भावस्थेपासून मरणापर्यंत एका व्यक्तीचे शिक्षण कसे चालावे याचा विचार त्यात आहे. म्हणून एकमेकांपासून अलग असलेल्या अशा विभागांमध्ये ग्रामोद्धाराचे कार्य मी सुरू करणार नाही तर अशी एखादी कामगिरी हाती घेईन की जिच्यामध्ये

या चारी बाबींचे एकत्रीकरण आहे. कारागिरी आणि धंदा ही शिक्षणापासून निराळी आहेत असे मी मानणार नाही. शिक्षण देण्याची ती माध्यमे आहेत असे मी मानीन. तेव्हा या योजनेत नई तालीमचा अंतर्भाव झाला पाहिजे हे नक्की.

हरिजन, १०-११-१९४६

ग्रामीण पुनर्घटनेमध्ये ग्रामीण सफाईचा समावेश नसेल तर सध्या आहेत त्याप्रमाणे आपली खेडेगावे म्हणजे घाणीचे ढीगच राहतील. ग्रामांतील सफाई हा ग्रामीण जीवनाचा जिव्हाळ्याचा भाग आहे. तो जितका महत्त्वाचा आहे तितकाच अंमलात आणण्याला कठीण आहे. युगानुयुगे चालत आलेल्या घाणेरड्या सवयी साफ नाहीशा करायला भगीरथ प्रयत्न करावे लागतील. ज्या ग्रामसेवकाला ग्रामीण सफाईचे शास्त्र समजलेले नाही व जो यशस्वी भंगी नाही, त्याला ग्रामसेवेच्या कार्यात नीटपणे समाविष्ट होताच येणार नाही.

हे प्राय: बहुतेकांना मान्य झाल्यासारखे दिसत आहे की नवशिक्षणा (नई तालीम) खेरीज हिंदुस्तानातील लक्षावधी मुलांना शिक्षण देणे अशक्यप्राय आहे. तेव्हा ग्रामसेवकाने प्रथम स्वत: ते घेऊन त्यात पारंगत झाले पाहिजे आणि नंतर स्वत: नई तालीम पद्धतीचा शिक्षक झाले पाहिजे.

नई तालीम घेता-घेता प्रौढशिक्षणाचा प्रश्न आपोआप सुटेल. ज्या ठिकाणी हे नवशिक्षण नीटपणे रुजले आहे तेथे मुलेच आपआपल्या आई-बापांचे शिक्षक होतात. ते कसेही असो, ग्रामसेवकाने प्रौढशिक्षणही आपल्या अंगावर घेतले पाहिजे.

स्त्रीला पुरुषाचे अधिक चांगले अर्धांग असे म्हणतात. जोपर्यंत कायदेशीर रीतीने स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने हक्क मिळत नाहीत, जोपर्यंत मुलीचा जन्मप्रसंग हा मुलाच्या जन्मप्रसंगाइतकाच आनंदाचा समजला जात नाही, तोपर्यंत आपण अशी खूणगाठ बांधली पाहिजे की हिंदुस्तानाला अर्धांगवात झाला आहे. म्हणून प्रत्येक ग्रामसेवकाने प्रत्येक स्त्रीला आई,

बहीण अथवा मुलगी मानले पाहिजे आणि त्यांचा आदर केला पाहिजे. अशा ग्रामसेवकालाच गावकऱ्यांचा खरा विश्वास संपादन करता येईल.

जे लोक निरोगी नाहीत त्यांना स्वराज्य कधीच मिळविता येणार नाही. म्हणून आपल्या लोकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष केल्याच्या आरोपाचे धनी आपण होऊन भागणार नाही. प्रत्येक ग्रामसेवकाला आरोग्य रक्षणाच्या सामान्य तत्त्वांचे ज्ञान असलेच पाहिजे.

एक समान भाषा असल्याशिवाय एक राष्ट्र कधीच अस्तित्वात येणार नाही. हिंदी-हिंदुस्तानी-उर्दू वगैरे चर्चेच्या उचापतीत न पडता ग्रामसेवकाने इतके ज्ञान संपादन करावे की त्याने बोललेली भाषा हिंदू व मुसलमान गावकऱ्यांना समजेल.

आपल्या इंग्रजी भाषेवरील उतू जाणाऱ्या प्रेमाने आपल्याला प्रांतिक भाषांशी बेईमान बनवले आहे. या प्रतारणेच्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून का होईना, ग्रामसेवकाने गावकऱ्यांच्या ठिकाणी आपल्या भाषेबद्दलचे प्रेम वाढीस लावावे. त्याने हिंदुस्तानातील सर्व भाषांबद्दल सारखाच आदर बाळगावा आणि ज्या भागांत तो काम करीत असेल तेथील भाषा त्याने शिकलीच पाहिजे. त्याने असे केले म्हणजे ग्रामस्थांचा आपल्या स्वत:च्या भाषेबद्दलचा आदर वाढेलच.

परंतु आर्थिक समानतेच्या भक्कम पायावर जर हे सर्व बांधकाम झाले नाही, तर ते वाळूच्या किल्ल्याप्रमाणे होईल. आर्थिक समानता याचा अर्थ केव्हाही असा समजता कामा नये की जगातील उपभोग्य वस्तूंची प्रत्येक मनुष्याला सारखी वाटणी मिळावी. परंतु या समानतेचा इतका अर्थ खचितच आहे की प्रत्येकाला राहावयाला घर असावे, पुरेसे आणि पौष्टिक (समतोल) अन्न खाण्याला मिळावे आणि अंगभर खादीची वस्त्रे मिळावीत. शिवाय असाही अर्थ जरूर आहे की, आज अस्तित्वात असलेली क्रूर असमानता अहिंसक मार्गांनी नाहीशी व्हावी.

हरिजन, १८-८-१९४०

८. ग्रामसफाई

गावांमध्ये ज्या गोष्टींकडे प्रथम लक्ष दिले पाहिजे त्या म्हणजे तळी व विहिरी साफ करून त्यातील पाणी स्वच्छ राखणे आणि उकिरडे नष्ट करणे. जर ग्रामसेवक या कामी स्वत:च झटले आणि मजुरी देऊन कामाला लावलेल्या भंग्यांप्रमाणे दररोज काम केले आणि ग्रामस्थांना अशी जाणीव करून दिली की अखेरीस हे सर्व काम त्यांचे त्यांनीच करावयाचे आहे, तर त्यांनी अशी खात्री बाळगावी की आज न उद्या ते स्वखुशीने सहकार्य करतील.

रस्ते व गल्लीबोळ वगैरे सर्व कचरा, घाण काढून साफ करावे. त्याचे वर्गीकरणही करावे. काही कचरा असा असतो की त्याचे खत बनविता येईल, काही भाग नुसता पुरूनच टाकावा लागेल आणि काही भागाला ताबडतोब संपत्तीचे रूप देता येईल. एखादे हाडूक जरी हाती लागले तरी त्यापासून एखादी उपयुक्त वस्तू बनेल किंवा त्याची पूड बनवून त्याचे खत होईल. चिंध्या व रद्दी कागदाचे तुकडे कागद बनविण्याच्या कामी येतील आणि मलमूत्राचा उपयोग शेतामध्ये टाकण्याच्या उत्तम सोनखतासाठी करता येईल. मलमूत्राचा उपयोग ते मातीत मिसळून वर मातीचाच थर देऊन एक फुटापेक्षा जास्त न खणता झाकून टाकणे. ग्रामीण आरोग्य या विषयावरील आपल्या पुस्तकात डॉ. पूर म्हणतात, नऊ इंच किंवा बारा इंचांपेक्षा अधिक खोल मलमूत्र गाडू नये (मी हे स्मरणानेच लिहीत आहे). त्या ग्रंथकाराचे असे म्हणणे आहे की, वरची माती ही कृमी-किटकांनी भरलेली असते. इतक्या खोल थरात प्रकाश आणि पाणी सहज प्रवेश करू शकतात. कृमीकीटक प्रकाश व हवा यांच्या मदतीने त्यात सहज प्रवेश करतात आणि एका आठवड्याच्या आत त्या साऱ्या मलमूत्राची सुगंधी मृत्तिका करून सोडतात. कोणाही गावकऱ्याला प्रत्यक्ष प्रमाणाने ही परीक्षा करता येईल. हे करण्याचा मार्ग म्हणजे पक्क्या

संडासांत, मातीची अथवा धातूची बकेटे ठेवणे आणि ती मुद्दाम तयार केलेल्या जागेत दररोज रिकामी करून टाकणे किंवा मुद्दाम खणलेल्या चरांमध्ये शौचविधी उरकणे व त्यावर माती टाकणे. मलमूत्राचा साठा गावच्या सार्वजनिक जागेत किंवा एखाद्या व्यक्तीच्या शेतामध्ये करता येईल. सर्व गावकऱ्यांच्या सहकार्यानेच हे सगळे शक्य होईल. जास्तीत जास्त मैला जमा करून स्वत:साठीच त्याला मूल्यवान संपत्तीचे रूप देता येईल. सध्या लक्षावधी रूपयांचे हे मौल्यवान खत नुसतेच फुकट जात आहे, त्याने हवा खराब होते आणि या सगळ्या कारभारांत रोगराई फैलावते.

गावांतील तळ्यांचा उपयोग हवा तसा केला जातो. त्यातच स्नान, कपडे धुणे, पिण्याचे पाणी, स्वयंपाकाला पाणीही तेच घेतले जाते. काही गावांतील तळ्यात तर गुरेढोरेही शिरतात. म्हशी व टोणगे चिखला-पाण्यात लोळत असलेले पुष्कळ वेळी दिसतात. आश्चर्य हे आहे की, या गावांतील तळ्यांचा इतका पापी दुरुपयोग होत असूनही साथीचे रोग उद्‌भवून या खेड्यांचा संहार होत नाही! गावकऱ्यांना जे नाना तऱ्हेचे रोग होतात, त्याचे कारण तळ्यातील पाणी स्वच्छ राखले जात नाही असे वैद्यकीय पुराव्याने एकमताने सिद्ध झाले आहे.

हे सर्वमान्य होईल की हिंदुस्तानातील हाल व विपत्ती सहन करीत असलेल्या लोकांच्या अपरिमित हिताची अशी ही भूषणास्पद, चित्तवेधक आणि बोधपर अशी सेवा होईल. ज्या पद्धतीने हा प्रश्न हाताळण्यात यावा असे मी आतापर्यंत दाखवले आहे, त्यावरून मला अशी आशा वाटते की जर कार्यकर्ते राजीखुशीने व उत्साहाने पुढे येतील आणि जितक्या सहजपणे व अभिमानाने ते पेन्सिली व लेखण्या हाती घेतात, तेवढ्याच उत्साहाने केरसुणी व फावडे हाती घेतील तर खर्चाचा प्रश्न आपोआप निकालात निघेल. जे काही भांडवल पाहिजे ते एक केरसुणी, एक टोपली, एक फावडे व एक पिकाव आणि काही जंतुनाशक औषधे इतक्यांत

आवरेल. कोरडी राख हे मोठे जंतुनाशक आहे; याहून परिणामकारक जंतुनाशक केमिस्टसुद्धा देऊ शकणार नाही. पण परोपकारी केमिस्टांनी सांगावे की सर्वात परिणामकारक औषधी द्रव्य कोणते आहे, तसेच स्वस्त कोणते आहे आणि खेड्यांतच ग्रामस्थांना तयार करता येईल असे कोणते जंतुनाशक औषध आहे.

हरिजन, ८-२-१९३५

९. ग्रामीण औषधी मदत

अनेक संस्थांकडून माझ्याकडे जे अहवाल येतात, त्यांमध्ये ग्रामसेवेच्या कार्यात औषधपाण्याच्या मदतीला मोठेच प्राधान्य दिलेले आढळून येते. जो कोणी मनुष्य औषधपाण्याची मदत करण्याची जाहिरात करतो, त्याच्याकडे नजीकचे आणि लांबचे पुष्कळ लोक गोळा होतात आणि या रोग्यांना दवापाणी देण्यात येते. हीच ती वैद्यकीय मदत. यांत औषधे वाटणाऱ्याला विशेष काहीच त्रास नाही. त्याला रोगांची किंवा रोगलक्षणांची माहिती असण्याची गरज नाही. काही परोपकारी औषध विक्रेत्यांकडून त्याला ती फुकट धर्मादाय म्हणून मिळतात. फार विचार न करता दानधर्म करणाऱ्यांकडून देणग्या मिळतात. आणि अशा देणग्या दु:खी-पीडितांच्या मदतीसाठी दिल्या म्हणजे त्यांची सदसद्विवेकबुद्धी शांत होते.

अशा प्रकारची समाजसेवा हे सेवेचे अत्यंत आळशी स्वरूप आहे असे मला आढळून आले आहे. इतकेच नव्हे तर कित्येकदा ते घातक किंवा नुकसानकारकही ठरते. जेव्हा रोगी माणसाचे काम फक्त औषध पिऊन किंवा गिळून टाकणे एवढेच असते तेव्हा ते नुकसानकारक ठरते. हे औषध मिळाल्याने त्याच्या शहाणपणात काहीच भर पडत नाही. उलट त्याची स्थिती आता पहिल्यापेक्षा अधिकच वाईट होते. काही अव्यवस्थितपणाचे वर्तन हातून घडले तर त्याचे दुष्परिणाम नाहीसे करण्याची एखादी गोळी किंवा एखादा औषधाचा घोट फुकट किंवा अल्प किंमतीत मिळतो हे ज्ञान

प्राप्त झाल्यामुळे फिरून अव्यवस्थितपणे वागण्याचा मोह त्याला झाल्यावाचून राहत नाही. अशी मदत फुकट उपलब्ध झाल्यामुळे त्याच्या स्वाभिमानाला देखील बट्टा लागतो; स्वाभिमानी मनुष्याला आपण काहीच न देता दुसऱ्याकडून अशी देणगी घेणे लज्जास्पद वाटेल.

दुसऱ्या प्रकारची एक वैद्यकीय मदत आहे आणि ती मिळणे म्हणजे एखादा वर प्राप्त होण्याप्रमाणे आहे. ज्यांची खरी रोगपरीक्षा आहे, त्यांच्याकडून ही मदत मिळते. रोग्यांच्या वेगवेगळ्या तक्रारी का उत्पन्न होतात आणि कसे वागल्याने त्यांचे निर्मूलन होईल हे असले परीक्षक रोग्यांना समजावून देतात. असे लोकसेवक दिवसा-रात्री हवे त्याच्या मदतीला धावून जातील. अशी विचारपूर्वक दिलेली मदत म्हणजे आरोग्यसंपन्न राहण्याचे व निरोगी राहण्याचे शिक्षणच आहे. अशा उपाययोजनेने लोकांना स्वच्छतेने राहण्याचे व निरोगी राहण्याचे शिक्षण मिळते. परंतु अशा प्रकारची सेवा आज दुर्लभ झाली आहे. संस्थांच्या अहवालात वैद्यकीय मदतीचे निर्देश हे प्राय: एक प्रकारची जाहिरात करतात आणि वैद्यकीय उपचारांचा फायदा मिळवण्याला जेवढे ज्ञान किंवा श्रम लागतात, तेवढ्यांतच इतर कामांनाही मदत मिळू शकते. म्हणून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्वांना मी अशी आग्रहाची विनंती करीन की तुम्ही शहरात काम करा की खेड्यात करा, पण तुम्ही वैद्यकीय मदत पोहचविणे हा तुमच्या कामाचा सगळ्यात कमी महत्त्वाचा भाग समजा. असला काही उल्लेख टाळणे हेच जास्त बरे. आपल्या कार्यक्षेत्रांत रोगांचा प्रादुर्भाव होण्याचे टळावे म्हणून उपाययोजना करण्याकडे त्यांनी लक्ष द्यावे. त्यांच्याजवळील औषधांचा साठा शक्य तेवढा लहान असावा. आपल्या खेड्यांतील बाजारांतच कोणती औषधे मिळतात याचा त्यांनी अभ्यास करावा, त्यांचे गुणधर्म समजावून घ्यावे आणि शक्य तितका त्यांचाच उपयोग करावा.

हरिजन, ९-११-१९३५

माझे मत असे आहे की जर वैयक्तिक, कौटुंबिक आणि सार्वजनिक शुचिता कडकपणे पाळली गेली आणि अन्न आणि व्यायाम या बाबतींत नीट काळजी घेतली तर आजारी पडण्याचा किंवा रोगराई होण्याचा प्रसंगच उद्‌भवणार नाही. ज्या ठिकाणी आंतरबाह्य शुचिता असेल तेथे आजार अशक्य आहे. ग्रामस्थांना जर हे नीटपणे उमगले तर त्यांना डॉक्टर, वैद्य, हकीम यांची मुळीच जरूर भासणार नाही.

हरिजन, २६-५-१९४६

निसर्गोपचार

निसर्गोपचाराचा अर्थ असा की हे उपचार अगदी साधे व अगदी स्वस्त असले पाहिजेत. ध्येय असे आहे की हेच उपचार खेड्यांमध्ये करण्यात यावेत. ग्रामस्थांना याची सर्व साधने व सामुग्री उपलब्ध करता आली पाहिजे. गावांत जे मिळणारच नाही ते इतर कोठून मिळवावे. निसर्गोपचार म्हणजे व्यक्तीच्या जीवनविषयक दृष्टीकोनात अधिक चांगला बदल होणे असे नाही. त्याचा अर्थ इतकाच की आरोग्यपालनाच्या नियमांशी सुसंगत असे स्वत:च्या जीवनाचे नियमन करणे. इस्पितळात फुकट किंवा फी देऊन औषध घेण्यासारखा हा प्रकार नाही. इस्पितळात जाऊन जो मनुष्य मोफत उपचार करून घेतो, तो दान स्वीकारतो. पण जो माणूस निसर्गोपचार पद्धतीचा अवलंब करतो, तो कधीच भीक मागत नाही. स्वावलंबनाने स्वाभिमान वाढतो. शरीरयंत्रातील विषे काढून टाकून स्वत:ला निकोप बनविण्यासाठी तो योजना करतो आणि भविष्यकाळात आजारी न पडण्याकरिता खबरदारी घेतो.

योग्य प्रकारचा व समतोल आहार आवश्यकच आहे. हल्लीची खेडेगावे आपणासारखीच दिवाळखोर झाली आहेत. निसर्गोपचार योजनेचा एक प्रमुख व आवश्यक भाग असा आहे की गावांतच पुरेसे भाजीपाले, फळे व दूध पैदा झाले पाहिजे. या कामी जो वेळ खर्च होईल तो फुकट गेला असे समजण्याचे कारण नाही. यामुळे गावकऱ्यांचा फायदाच होईल

आणि अखेरीस सर्व भारताचा देखील फायदा होईल.

हरिजन, २-६-१९४६

१०. ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन

खेडेगावांत राहणाऱ्यांचा आपण एक मोठाच अपराध केलेला आहे आणि त्याचे प्रायश्चित्त घेण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे त्यांचे जे उद्योगधंदे आणि कारागिरी नष्ट झाली आहे, तिच्या पुनरुज्जीवनास उत्तेजन देणे. यासाठी त्यांना तयार बाजाराचे म्हणजे त्यांनी उत्पन्न केलेला माल खपविण्याचे आश्वासन देणे. परमेश्वरापेक्षा अधिक सोशिक व क्षमाशील कोणीच नाही. परंतु त्याच्याही सोशिकपणाला व क्षमाशीलतेला सीमा आहे. आपण जर खेडेगावांसंबंधीच्या आपल्या कर्तव्यात हेळसांड करू तर आपणच आपल्या नाशाला कारणीभूत होऊ. हे कर्तव्यही काही मोठे खडतर आहे असे नाही. ते अगदी खरे वाटणार नाही एवढे सोपे आहे. आपली मनोवृत्ती ग्रामनिष्ठ झाली पाहिजे आणि आपल्या सगळ्या गरजांचा विचार त्या साच्यातून केला पाहिजे; आपल्या व आपल्या कुटुंबाच्या गरजांची विवंचना ग्रामनिष्ठेच्या भिंगातून तपासली पाहिजे. याला काही मोठा खर्च लागत नाही. अगदी जवळच्या खेडेगावांत जाऊन स्वयंसेवकांनी कळवावयाचे की ते ग्रामस्थ जे काही उत्पादन करतील त्याला मोठ्या व लहान शहरांत खप आहे. सर्व जातीच्या, धर्माच्या, सर्व पक्षांच्या स्त्री पुरुषांना हे काम हाती घेता येईल. आपल्या देशाच्या खऱ्या अर्थशास्त्रीय भूमिकेशीही ते सुसंगत आहे.

हरिजन, १-३-१९३५

घरात लागणाऱ्या वस्तूंपैकी एकही अशी नसेल जी गावकऱ्यांनी पूर्वी केली नव्हती किंवा आता करू शकणार नाहीत. हा मानसिक बदल जर आपण चुटकीसरशी घडवून आणला आणि ग्रामस्थांवर आपली नजर केंद्रीत केली तर त्यांना लक्षावधी रुपये आपण मिळवून देऊ. सध्या मात्र

आपण त्यांचे सर्वतोपरी शोषण करतो आणि त्यांना परतफेड मात्र सांगण्यासारखी काहीच करत नाही. ही शोकांतिका आपण आता इथेच थांबवली पाहिजे. माझ्या मते अस्पृश्यतेविरुद्ध जी मोहीम सुरू आहे, तिचा अर्थही असाच व्यापक आहे; केवळ अस्पृश्यांना शिवणे सुरू करणे इतकाच मर्यादित नाही. त्यांनी केलेले जिन्नस घेणे व वापरणे त्यातच येते. शहरात खेडेगावचे सगळेच लोक हल्ली अस्पृश्यांसारखे झालेले आहेत. शहरवासी त्यांना ओळखत नाहीत, त्यांच्यामध्ये वसती करीत नाहीत आणि जर एखाद्याला खेड्यात राहणे भाग पडले तर शहरी जीवनाचीच आवृत्ती तो तिथे काढतो. जर तीस कोटी माणसांना सामावून घेण्याइतकी शहरे आपण उत्पन्न करू शकलो तरच हे क्षम्य ठरेल. हे तर ग्रामोद्योगांचे पुनरुज्जीवन करण्यापेक्षा फारच कठीण आहे; उत्तरोत्तर वाढणारे दारिद्र्य हटविण्यापेक्षाही कठीण आहे. सक्तीची बेकारी हे दुसऱ्या काही कारणांप्रमाणेच दारिद्र्यवर्धनाचे कारण आहे.

हरिजन, ३०-११-१९३४

जेव्हा खेड्यांचे शोषण थांबेल तेव्हाच त्यांचे पुनरुज्जीवन होऊ शकेल. जर मोठ्या प्रमाणावर देशाचे औद्योगीकरण झाले तर ग्रामस्थांचे उघड व अप्रत्यक्ष शोषण हे अगदी अटळ आहे. त्यातच बाजारपेठा मिळविणे आणि चढाओढ यांमुळे उत्पन्न होणाऱ्या अडचणींची भर पडेल. म्हणून खेडी स्वयंपूर्ण होण्यावरच आपण लक्ष केंद्रीत केले पाहिजे. त्यांचे उत्पादन हे मुख्यत: उपयोगाकरिता म्हणजे उपभोगाकरिता असले पाहिजे. जर ग्रामोद्योगांचे हे स्वरुप टिकविले तर गावकऱ्यांनी आधुनिक यंत्रसामुग्री वापरण्यालाही पर्याय नाही. मात्र ही यंत्र व हत्यारे त्यांना करता व वापरता आली पाहिजेत. दुसऱ्यांच्या शोषणासाठी त्यांचा साधन म्हणून उपयोग होऊ नये इतकेच माझे म्हणणे आहे.

हरिजन, २९-८-१९३६

११. खेडेगावांत चरख्याचे स्थान

माझ्या दृष्टीने चरखा हेच विराट जनतेचे आशास्थान आहे. आपले जे कोणत्या तऱ्हेचे स्वातंत्र्य होते ते चरखा नामशेष झाल्यानंतर जनतेने गमावले. ग्रामस्थांच्या कृषीकार्याला चरख्याची चांगली जोड होती आणि त्यांच्या जीवनाला एक प्रकारचा भारदस्तपणा चरख्याने दिला होता. विधवा स्त्रियांचा तर तो आसरा आणि सखाच होता. ग्रामस्थांना त्याने आळशी होऊ दिले नाही. कारण एक चरखा म्हटला म्हणजे त्याच्या अनुषंगाने आधी आणि नंतर कितीतरी उद्योगांचा निर्देश आपोआप होतो- सरकी काढणे, पिंजणे, पेळू तयार करणे, पांजणी करणे, रंगविणे व विणणे इतक्या क्रिया चरखा या एका वस्तूशी संलग्न आहेत. हे सर्व उद्योग गावांतील सुताराला व लोहाराला काम पुरवितात. चरख्यानेच भारतातील सात लाख खेड्यांना स्वयंपूर्ण होण्यास मदत केली. चरख्याच्या बहिर्गमनाबरोबर गावांतील इतर कुटीरोद्योगही गेले, उदाहरणार्थ तेलाचा घाणा. या उद्योगाची जागा इतर कोणत्याही उद्योगाने घेतली नाही; यांमुळे खेडेगावे विविध उद्योगांच्या नाशाने खंगली, त्यांचे सर्जनकौशल्य नष्ट झाले व जी थोडी मिळकत त्यांना होती तीही गेली.

म्हणून खेडेगावे जर पुन्हा टवटवीत व्हावयाची असतील तर अगदी सहज सुचणारा उपाय म्हणजे चरख्याचे पुनरुज्जीवन करणे व त्यामुळे जीवन पहिल्यासारखे पल्लवीत, बहरलेले आणि समृद्ध करणे.

नि:स्वार्थी, देशाभिमानी व हुशार अशा हिंदी माणसांची एक फौजच एकदिलाने या चरख्याचा संदेश खेड्यांत पसरविण्याला आणि ग्रामस्थांच्या निस्तेज नजरेत चैतन्य आणण्याला तयार झाल्यावाचून हे ग्रामीण पुनरुज्जीवनाचे कार्य होणार नाही. सहकार्याचा व प्रौढशिक्षणाचा हा अगदी समर्पक असा प्रयत्न ठरेल. ज्याप्रमाणे चरख्याचा एक-एक फेरा खात्रीचा व जीवनदायी असतो, त्याचप्रमाणे हा प्रयत्नही शांतपणे पण खात्रीने क्रांती

म्हणजे मोठे स्थित्यंतर घडवून आणील.

प्रस्तुत जो युक्तिवाद मी करीत आहे, त्याच्या योग्यतेची खात्री वीस वर्षे चरख्याचा जो अनुभव मी घेतला आहे त्यावरून मला पटलेली आहे. गरीब हिंदूंना आणि गरीब मुसलमानांना तो सारखाच उपयोगी पडत आलेला आहे. काहीदेखील गाजावाजा अथवा गोंगाट न करता लाखो कामगारांच्या खिशात आतापर्यंत पाच कोटी रुपये गेलेले आहेत.

म्हणून मी नि:शंकपणे म्हणतो की, सर्वधर्मी श्रमजीवी जनतेच्या दृष्टीने चरखा हाच स्वराज्य आणून देईल. खेडेगावांना त्यांचे योग्य स्थान पुन्हा प्राप्त करून देतो आणि उच्च नीच ही भावना नष्ट करतो, असा हा चरखा आहे.

हरिजन, १३-४-१९४०

आपले ध्येय असेच आहे की प्रत्येक खेडेगाव प्राय: आज ज्याप्रमाणे आपल्याला लागणारे सगळे धान्य पैदा करते, त्याप्रमाणे आपल्या गरजेपुरते कातण्याचे व विणण्याचे कामही प्रत्येक खेडेगावाने करावे. स्वत:ला पुरेल इतके धान्य निर्माण करण्यापेक्षा स्वत:च्या निर्वाहाला लागेल इतके सूत कातणे व कापड विणणे अधिक सोपे आहे. प्रत्येक गावाला स्वत:च्या गरजेपुरता कापूस साठवून ठेवून सूत कातून कापड विणण्याला काहीच अडचण येण्याचे कारण नाही.

यंग इंडिया, ११-८-१९२१

१२. इतर ग्रामोद्योग

इतर ग्रामोद्योगांची बाब खादीपेक्षा निराळी आहे. त्या उद्योगांत स्वत:वरच विसंबून करण्याच्या श्रमाला अवकाश फारसा नाही. त्या प्रत्येक व्यवसायामध्ये काही थोड्या लोकांच्या श्रमशक्तीच्या वापराला जागा आहे. परंतु खादीला पोषक व उपकारक असे त्या उद्योगांचे स्वरूप निखालस आहे. खादीशिवाय त्यांच्या अस्तित्वाला वाव नाही आणि त्यांच्याशिवाय खादीला एक प्रकारचा डौलदारपणा किंवा भारदस्तपणा

येणार नाही. खेडेगावांचा संसार हातांनी दळणे, हातांनी कुटणे, आगपेट्या बनविणे वगैरे आवश्यक व्यवसायांशिवाय पूर्ण होणारच नाही. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना यात लक्ष घालता येईल आणि ते जर ग्रामस्थच असले अथवा गावातच स्थायिक झाले तर या उद्योगांना त्यांना नवा पेहराव चढविता येईल व त्यामध्ये नवजीवन ओतता येईल. जेव्हा आणि जेथे शक्य होईल तेव्हा व तेथे खेडेगावी तयार झालेल्या वस्तूंचाच वापर करणे ही त्यांनी आपल्या अभिमानाची बाब करावी. जर अशी मागणी झाली तर आपली खेडेगावे आपल्या बहुतेक गरजा भागवू शकतील याबाबत शंका नको. आपली मनोवृत्ती ग्रामीण झाली म्हणजे पाश्चात्यांच्या अनुकरणाचे किंवा तेथे बनविलेल्या वस्तूंचे आकर्षण आपणास वाटणार नाही आणि ज्यामध्ये दारिद्र्य, उपासमार आणि आळस यांचे नामोनिशाण राहणार नाही, अशा नवभारताला साजेशी खरी राष्ट्रीय अभिरुची आपल्या ठिकाणी उत्पन्न होईल.

कंस्ट्रक्टिव्ह प्रोग्राम, पृष्ठे १५-१६, आवृत्ती १९४८

ग्रामीण चामडे कमाविण्याचा धंदा

खेडेगावांतील चामडी कमाविण्याचा धंदा हा खुद्द भारताइतकाच पुरातन आहे. हा केव्हापासून नीच समजला जाऊ लागला हे कोणालाच सांगता येणार नाही. प्राचीन काळी तो तसा मानला जात असेल हे शक्य नाही. परंतु आपल्याला माहीत आहे की या अत्यंत उपयुक्त व आवश्यक अशा व्यवसायाने जवळजवळ दहा लक्ष लोकांना वंशपरंपरेने अस्पृश्य बनवून टाकलेले आहे. जेव्हा शारीरिक श्रमाकडे तुच्छतेने पाहण्याला व त्याची हयगय करण्याला सुरुवात झाली, तेव्हा या दुर्दैवी देशात एक दुर्दिनच उगवला. जे या पृथ्वीचे खरोखर भूषण होते, ज्यांच्या व्यवसायावर या देशाचे अस्तित्व अवलंबून होते अशा लक्षावधी लोकांना हीन समजण्यात येऊ लागले आणि रिकामेपण असलेल्या अल्पसंख्यकांना उच्च व हक्कदार समजण्यात येऊ लागले. याचा परिणाम दुर्दैवी असाच

झाला; हिंदुस्तानाचे नैतिक व भौतिक नुकसान झाले. यापैकी भौतिक नुकसान जास्त की नैतिक नुकसान जास्त याची मोजदाद करणे कठीण आहे. परंतु शेतकऱ्यांची व कारागिरांची जी अक्षम्य हेळसांड झाली आहे, त्यामुळे आपल्याला दारिद्र्यात, निराशेत आणि पिढीजात आळसात रुतून बसावे लागले आहे. भारताचे उत्कृष्ट हवा-पाणी, उंच-उंच पर्वत, मोठ-मोठ्या नद्या आणि विस्तीर्ण समुद्रकिनारा यांनी अमर्याद संपत्तीसाधने त्याला दिलेली आहेत आणि त्यांचा पूर्ण उपयोग केला म्हणजे आमच्या खेडेगावांतून दारिद्र्य आणि रोगराई यांचे निवारण व्हावयास पाहिजे. परंतु बुद्धी व शारीरिक श्रम यांची फारकत झाल्यामुळे आम्ही दुनियेतील कदाचित अत्यंत अल्पायुषी, अत्यंत बेअकली-बेवकूफ आणि शोषित असे राष्ट्र बनलो आहो. माझ्या या आरोपपत्रिकेचा उत्तम पुरावा म्हणजे खेडेगावांतील कातडी कमाविण्याच्या व्यवसायाची सध्याची स्थिती.

अशी गणती करण्यात आली आहे की, दरसाल सुमारे नऊ कोटी रुपयांची कच्ची कातडी परदेशी रवाना होतात आणि तीच पुढे पक्क्या मालाच्या स्वरुपात हिंदुस्तानात परत येतात. यामध्ये प्रत्यक्ष पैशाचे नुकसान आहेच,पण बौद्धिक कमकुवतपणाचेही ते लक्षण आहे. कातडी कमाविण्याच्या व्यवसायाचे शिक्षण आपल्याला मिळत नाही आणि दररोज लागणाऱ्या असंख्य चामड्याच्या वस्तूही आपल्याला तयार करता येत नाहीत.

तांत्रिक कौशल्याचा उपयोग करून एक मोठी समस्या सोडवून दाखविण्याला व कामगिरी बजावण्याला शंभर टक्के स्वदेशीच्या अभिमान्यांना येथे भरपूर अवकाश आहे. यात हरिजनांची सेवा घडते, ग्रामस्थांची सेवा घडते आणि बेकारीमुळे कामाच्या शोधात असलेल्या मध्यमवर्गीय बुद्धिवंतांना सन्मानाचे उपजिविकेचे साधनही मिळू शकते. बुद्धिजीवी लोकांना ग्रामीण बांधवांच्या सहवासाची योग्य अशी संधी मिळेल, या आणखी एका गोष्टीची एकंदर विचारांत भर घाला.

हरिजन, ७-९-१९३४

'कंपोस्ट' खत

माणसाचे आणि जनावरांचे मलमूत्र केरकचऱ्यामध्ये मिसळले म्हणजे उत्तम सोनखत तयार होते व ते एक फार मूल्यवान जिन्नस बनते. ज्या जमिनीला त्याची प्राप्ती होईल, तिचा सुपीकपणा वाढलाच म्हणून समजावे. असे खत तयार करणे हा एक ग्रामोद्योगच आहे. परंतु इतर अनेक ग्रामोद्योगांप्रमाणेच या उद्योगाचे चांगले परिणामही जेव्हा कोट्यवधी भारतीय त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी सहकार्य करण्याला व भारताला भरभराटीला आणण्यासाठी झटतील, तेव्हाच दिसून येतील.

दिल्ली डायरी, पृष्ठे २७०-७१

जर हिंदुस्तानची जनता खुशीने सहकार्य करेल, तर या देशातील धान्याची टंचाई दूर होईल. इतकेच नव्हे तर गरजेपेक्षा जास्त धान्य हिंदुस्तानात पैदा होईल. या सेंद्रिय (प्राणिज) खतामुळे जमिनीचा कस सदैव वाढतो, कधीही कमी होत नाही. दररोज होणारी घाण व केरकचरा, जर बरोबर रीतीने खड्डयांत पुरून पुन्हा सोनखताच्या रुपाने जमिनीला पोचता होईल. तर लाखो रुपये वाचतील आणि अन्नधान्ये व द्विदलधान्ये यांची एकंदर पैदासही वाढेल. याखेरीज केरकचऱ्याचा व घाणीचा युक्तीने निकाल लावला म्हणजे आजूबाजूची जागा स्वच्छ राहते आणि स्वच्छता व देवकळा यांत फारसे अंतर नाही आणि आरोग्याला तर ती पोषक आहेच आहे.

हरिजन, २८-१२-१९४७

१३. काँग्रेस मंत्रिमंडळांचे कर्तव्य

आता काँग्रेसची मंत्रिमंडळे अधिकारारुढ झालेली असल्यामुळे खादीसाठी आणि इतर ग्रामोद्योगांसाठी ती काय करणार आहेत ही चौकशी करणे अगदी रास्त आहे. एखादा मंत्री या कामासाठी खास नेमला जावो अथवा न जावो, एक खाते सुरू करणे खात्रीने गरजेचे आहे. सध्याच्या

अन्नाच्या आणि कापडाच्या टंचाईच्या दिवसांत या खात्याला खूपच मदत करता येईल. ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशन आणि ऑल इंडिया व्हिलेज इंडस्ट्रीज असोसिएशनमार्फत मंत्र्यांना तज्ञांची मागणी करता येईल. अगदी थोड्या भांडवली खर्चात आणि कमीत कमी वेळात साऱ्या हिंदुस्तानाला खादीचा पुरवठा करता येईल. प्रत्येक प्रांतिक सरकारने ग्रामस्थांना सांगितले पाहिजे की त्यांच्या स्वत:च्या उपयोगासाठी लागणारी सर्व खादी त्यांनीच तयार केली पाहिजे. यामुळे आपोआपच स्थानिक उत्पादन आणि वाटणी होऊ लागेल. आणि थोडीशी जरूरीपेक्षा जास्त पैदासही नि:संशय होऊ लागेल आणि ती शहरांच्या उपयोगासाठी देऊन स्थानिक गिरण्यांवर पडणारा ताण थोडातरी कमी होईल. जगातील इतर भागांची जरुर भागविण्यासाठी या गिरण्यांना मग हातभार लावता येईल.

हा परिणाम कशा रीतीने घडवून आणता येईल? सरकारला ग्रामस्थांना अशी नोटीस देता येईल की, त्यांनी आपापल्या गावांना लागणारी खादी स्वत: तयार करावी अशी अपेक्षा आहे आणि एका ठरलेल्या तारखेनंतर त्यांना कापडाचा पुरवठा करण्यात येणार नाही. सरकार आपण आपल्याकडून ग्रामस्थांना कापसाचे बी-बियाणे अथवा कापूस जेव्हा लागेल तेव्हा मूळ किमतीने पुरवील आणि खादी तयार करायला लागणारी आयुधे-हत्यारेही मूळ किमतीला देईल आणि सुमारे पाच वर्षांत हलक्या हप्त्यांनी या रकमेची फेड व्हावी. ज्या ठिकाणी गरज असेल, तेथे शिक्षकांचा पुरवठाही सरकार करेल आणि त्यांची जादा खादी विकत घेण्याचाही पत्कर घेईल. मात्र त्यांना लागणारी सगळी खादी त्यांनी स्वत: अगोदर तयार करून ठेवली असली पाहिजे. व्यवस्थापकीय खर्च फारसा केल्याशिवाय आणि उगीच आरडाओरड न करता कापडाच्या टंचाईचा प्रश्न अशा रीतीने निकालात निघू शकेल.

सर्व खेडेगावांची पाहणी करण्यात येईल आणि एकाएका गावी मदत न घेता स्थानिक स्तरावर कोणत्या वस्तूंचे उत्पादन होऊ शकते त्यांची

यादी करण्यात येईल. त्यांतील गावांच्या उपयोगासाठी किती हव्यात व किती बाहेर विक्रीला पाठविता येतील त्यांची यादी होईल. उदाहरणार्थ घाण्याचे तेल, घाण्यानेच काढलेले जाळण्याचे तेल, हाताने सडलेला तांदूळ, ताडगूळ, मध, खेळणी, चटया, हातकागद, साबू वगैरे पदार्थांच्या अशा याद्या होतील. जर पुरेशी काळजी घेण्यात आली तर आज मेलेली किंवा मृतप्राय झालेली खेडी पुन्हा जिवंत होतील आणि स्वत:च्या गरजा भागविण्याचे आणि हिंदुस्तानातील छोट्या मोठ्या शहरांच्याही गरजा पुऱ्या करण्याचे त्यांच्या ठिकाणी असलेले सामर्थ्य उघड करून दाखवतील.

याखेरीज केवळ अक्षम्य अशा हयगयीमुळे निकामी झालेली हिंदुस्तानची पशुसंपत्ती अमर्याद आहे. अजून त्याला पुरेसा अनुभव नाही. पण गोसेवा संघ या कामी बहुमोल मदत करू शकेल.

पायाभूत शिक्षणाअभावी ग्रामस्थांची शिक्षणाच्या बाबतीत उपासमार होत आहे. हिंदुस्तानी तालिमी संघाला या अत्यंत क्लिष्ट अशा कार्यात मदत देता येईल.

हरिजन, २८-४-१९४६

१४. सहकारी पशुपालन

आपल्या स्वत:च्या घरात गुराढोरांच्या हिताकडे योग्य व शास्त्रीय दृष्टीने पाहणे हे एकट्या शेतकऱ्याला मुळीच शक्य नाही. इतर अनेक कारणांप्रमाणे, सामुदायिक प्रयत्न होत नाहीत ही गायींची पैदास निकृष्ट प्रतीची होण्याचे आणि एकंदरीत गुराढोरांची स्थिती खालावण्याचे प्रमुख कारण आहे.

जीवनाच्या प्रत्येक शाखेत सामुदायिक अथवा सहकारी प्रयत्नांचा अवलंब करावा याच ध्येयाने दुनिया आज वाटचाल करीत आहे. या दिशेने पुष्कळच कार्य झालेले आहे आणि होत आहे. हे तत्त्व आपल्याकडेही आलेले आहे परंतु त्याचे रूप असे चित्रविचित्र झालेले आहे

की, त्यामुळे आमच्या देशातील गरिबांना त्याचा काही फायदा होत नाही. त्याप्रमाणेच लोकसंख्या वाढल्यामुळे सामान्य शेतकऱ्याच्या जमिनी दिवसेंदिवस कमी होत आहे. शिवाय एका व्यक्तीजवळ जी जमीन असते तिचे तुकडे झालेले असतात. अशा शेतकऱ्यांनी घरी गुरे पाळणे आत्मघातकीपणाचे आहे; परंतु आज त्यांची नेमकी हीच स्थिती आहे. अर्थशास्त्र विचाराला जे प्राधान्य देतात आणि धार्मिक, नैतिक अगर भूतदयामूलक विचारांकडे जे दुर्लक्ष करतात, त्यांचे अगदी आक्रोश करून सांगणे आहे, आजकाल शेतकऱ्यांची गुरेढोरेच त्याला खाऊन टाकीत आहेत. कारण त्यांच्या दाणापाण्यावर जो खर्च होतो, तो त्यांच्यापासून होणाऱ्या मिळकतीच्या मानाने अगदीच विषम प्रकाराचा व प्रमाणाबाहेर आहे. ते म्हणतात की सरसकट अशा निरुपयोगी जनावरांची हत्या न करणे हा मूर्खपणा आहे.

जे भूतदयावादी आहेत, त्यांनी या प्रश्नाबद्दल काय धोरण स्वीकारावे? याचे उत्तर असे उघडच आहे की आपण अशी एखादी युक्ती शोधून काढली पाहिजे जी योजली असता गुराढोरांचे प्राणरक्षण करता येईल आणि आपणाला ती भार होणार नाहीत. माझी खात्री आहे की सहकारी प्रयत्नांची आपल्याला फार मोठ्या प्रमाणात मदत होईल. पुढे दिलेले तुलनात्मक विचार उपयुक्त ठरतील:

(१) सामुदायिक पद्धतीमध्ये आजच्याप्रमाणे कोणाही शेतकऱ्याला गुरेढोरे आपल्या घरात ठेवता येणार नाहीत. त्यांच्या श्वासोच्छ्वासाने हवा बिघडते व जागाही ते खराब करतात. पशूंसमवेत राहणे यात भूतदयाही नाही व शहाणपणाही नाही. मनुष्याने असे राहावे अशी (निसर्गाची वा ईश्वराची) योजना नाही. गुरेढोरे आज जी जागा अडवून बसतात, ती शेतकऱ्याच्या आणि त्याच्या कुटुंबाच्या कामी येईल, मात्र त्यासाठी सामुदायिक पद्धतीचा अवलंब केला पाहिजे.

(२) जसजशी गुरांची संख्या वाढत जाते तसतसे शेतकऱ्याला घरात

राहणेच अशक्य होते. म्हणून तो वासरे विकून टाकतो व म्हशींना होणाऱ्या पारडांची कत्तल करणे त्याला भाग पडते किंवा त्यांना बाहेर हाकून देऊन उपासमारीने त्यांचे मरण ओढवून आणावे लागते. जर सहकारी पद्धतीने गुरांची काळजी घेण्याचे ठरविले तर हा सगळा अमानुषपणा टाळता येईल.

(३) सामुदायिक पद्धतीचा अवलंब केल्याने, गुरे जेव्हा आजारी पडतात तेव्हा त्यांना वैद्यकीय मदत मिळवून देणे खात्रीचे होते. कोणाही सामान्य शेतकऱ्याला स्वत:च्या जबाबदारीवर हे अशक्य आहे.

(४) त्याचप्रमाणे एक निवडून घेतलेला पोळ अनेक गायींची गरज पुरी करण्याला सामुदायिक पद्धतीखाली बाळगता येईल. नाही तर कोणी तरी उपकार करण्याचे मनात आणल्याशिवाय हे अशक्य होईल.

(५) सहकारी पद्धतीने एखादे मोठे कुरण गुरचरणासाठी किंवा गुरांना हिंडण्या-फिरण्यासाठी उपलब्ध होऊ शकेल. आज अशा प्रकारची काही व्यवस्था वैयक्तिक रीतीने शेतकऱ्यांना करता येत नाही.

(६) सामुदायिक पद्धतीखाली चारा-पाण्याचा खर्च बराच कमी होईल.

(७) चांगल्या किमतीला दुधाची विक्री करणे बरेच सुलभ होईल आणि एक व्यक्ती या नात्याने दुधात भेसळ करण्याचा जो मोह उत्पन्न होतो, त्याची गरज राहणार नाही.

(८) व्यक्तिश: प्रत्येक गायीची अथवा म्हशीची पात्रता ठरविणे कठीण आहे. परंतु खेड्यांतील सर्वच गुरांची तपासणी करण्याचे ठरविले म्हणजे ते कठीण होणार नाही व त्यांची प्रत व पात्रता सुधारत जाईल.

(९) सहकारी रीतीने गुरांचे पालनपोषण व्हावे या सिद्धांताच्या पुष्टीसाठी यापूर्वी सांगितलेले फायदे म्हणजे पुरेसा युक्तिवाद आहे. सर्वात महत्त्वाचे कारण म्हटले म्हणजे खासगी रीतीने गायी म्हशी पाळण्यामध्ये आपण त्यांची स्थिती वाईट करतो व आपलीही वाईट करून घेतो आणि म्हणून हे वैयक्तिक पशुपालन सोडून दिले पाहिजे. तेव्हा ही सहकारी पशुपालनाची सुधारणा अंमलात आणून आपण आपले स्वत:चे व त्यांचे

रक्षण केले पाहिजे.

त्याचप्रमाणे माझे असे ठाम मत आहे की सामुदायिक सहकारी शेतीचा अवलंब केल्याखेरीज शेतीचे पूर्ण फायदे आपण कधीही मिळवू शकणार नाही. खरोखरच जमिनीचे कसे तरी शंभर तुकडे करण्यापेक्षा शंभर कुटुंबांनी सामुदायिक रीतीने सगळी जमीन कसून निघालेले उत्पन्न शंभर हिश्श्यांमध्ये वाटावे हे संयुक्तिक नाही काय? आणि जे जमिनीला लागू पडते ते पशुधनालाही लागू पडते.

एकदम ही नवी जीवनपद्धती स्वीकारण्याला लोकांना अनुकूल करणे हे कठीण आहे, ही अगदी स्वतंत्र बाब आहे. सरळ आणि अरुंद रस्ता हा चालायला नेहमीच कठीण असतो. गोसेवेच्या कार्यक्रमांतील प्रत्येक पाऊल हे काटेरी आहे. पण अडचणी ओलांडून जाऊनच आपला रस्ता अधिक सोपा होण्याची आशा आपण करू शकतो. खाजगी प्रयत्नांपेक्षा सामुदायिक प्रयत्नांनी पशुपालन अधिक फायदेशीर आहे हे सांगणे एवढाच तूर्त माझा उद्देश आहे. माझे शिवाय असे म्हणणे आहे की सामुदायिक प्रयत्न हाच बरोबर मार्ग आणि वैयक्तिक प्रयत्न हा चुकीचा मार्ग आहे. खरे पाहता, सहकार्यानेच व्यक्तीला आपले स्वातंत्र्य संरक्षिता येते. पशुपालनाच्या बाबतीत वैयक्तिक प्रयत्नांनी स्वार्थपरता व दयाहीनता यांची वाढ झाली आहे आणि सामुदायिक यत्नांनी या दोनही प्रवृत्तींचा नायनाट न झाला तरी ऱ्हास खचितच होईल.

हरिजन, १५-२-१९४२

१५. ग्रामीण प्रदर्शने

खेडेगावे नुसती जगावी इतकेच नाही तर त्यांनी बलवान व्हावे आणि भरभराटीस यावे ही जर आपली मनिषा आणि श्रद्धा असेल तर ग्रामीण दृष्टीकोनाचा स्वीकार करणे म्हणजेच बरोबर दृष्टीकोन स्वीकारणे होय. हे जर खरे असेल, तर ग्रामीण प्रदर्शनांमध्ये शहरांतील प्रदर्शनात दिसून

येणाऱ्या भपक्याला आणि बडेजावाला मुळीच जागा नाही. शहरांमध्ये जे निरनिराळे खेळ व करमणुकीचे प्रकार असतात त्यांची या प्रदर्शनांत मुळीच आवश्यकता नाही. त्याला एखाद्या तमाशाचे किंवा उत्पन्नाचे साधन असे स्वरूप येता कामा नये. त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांच्या जाहिरातबाजीचे साधनही ते होता कामा नये. प्रदर्शनात विक्रीला मज्जाव असला पाहिजे. खादी व ग्रामोद्योगनिर्मित पदार्थांचीदेखील तेथे विक्री होऊ नये. प्रदर्शन हे एक शिक्षणाचे माध्यम असले पाहिजे, ते आकर्षक जरूर असले पाहिजे आणि त्याची मांडणी अशी पाहिजे की आपणही अनेकदा एखादा हुन्नर शिकावा अशी स्फूर्ती ग्रामस्थांना प्रदर्शन पाहून झाली पाहिजे. सध्याच्या ग्रामीण जीवनातील ठळक दोष व उणिवा त्यात दाखविल्या गेल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे ग्रामोद्धाराची मोहीम सुरू झाल्यापासून गावांतील कोणकोणते दोष नाहीसे झाले आहेत ते दाखविणारे प्रगतीपत्रकही प्रदर्शनात असावे. ग्रामीण जीवन सौंदर्यसंपन्न कसे करता येईल याबद्दलची काही शिकवणही ग्रामीण प्रदर्शनात मिळाली पाहिजे.

वरील शर्तींशी सुसंगत असे प्रदर्शन भरवायचे असल्यास ते कसे रचावे हे आता पाहू या.

१. दोन खेड्यांचे नमुने असावेत. त्यांतील एक सध्या असलेल्या नमुन्याचे आणि दुसरे सुधारलेल्या नमुन्याचे. सुधारलेले खेडे जिकडेतिकडे स्वच्छ असेल. त्यामधील घरे, रस्ते, आजूबाजूची जागा व शेते अगदी लख्ख असतील. पशुधनही सुधारलेले दाखवले पाहिजे. पुस्तके, चित्रे, नकाशे वगैरेंच्या उपयोगाने कोणत्या व्यवसायांनी व कशी अधिक प्राप्ती झाली हे दाखविले पाहिजे.

२. विविध ग्रामीण व्यवसाय कसे चालवावे, त्यासाठी लागणारी हत्यारे वगैरे कोठून आणावी व कशी करावी हे प्रदर्शनात दाखविले पाहिजे. प्रत्येक व्यवसायाच्या कामाचे प्रात्यक्षिक दाखवावे. हे सर्व असून शिवाय पुढील गोष्टी आणखी असाव्या:

(अ) नमुनेदार ग्रामीण आहार, (आ) ग्रामीण व्यवसाय व यांत्रिक व्यवसाय यांची तुलना, (इ) दुभती व इतर जनावरे कशी पाळावी व वाढवावी याचे धडे, (ई) कला विभाग, (उ) नमुनेदार ग्रामीण पायखाना, (ऊ) शेतावरील कचऱ्यापासून बनविलेले खत आणि रासायनिक खत यांमधील फरक, (ए) मृत प्राण्यांची हाडे, कातडी वगैरे यांचा उपयोग, (ऐ) ग्रामीण संगीत, ग्रामीण वाद्ये व नाटके, (ओ) ग्रामीण खेळ, आखाडे व व्यायामाचे प्रकार, (औ) नवी तालीम, (अं) ग्रामीण औषधे, (अः) ग्रामीण प्रसूतीगृह.

प्रारंभीच निर्देशित केलेल्या धोरणाला अनुसरून ही यादी आणखीही वाढविता येईल. मी फक्त उदाहरणादाखल सुचविले आहे; मी सगळे काही सांगून संपविले आहे असे नव्हे. चरखा व इतर ग्रामोद्योग यांचा उल्लेख मी केला नाही कारण त्यांची जागा ही अध्याहृतच आहे. त्यांच्याशिवाय हे प्रदर्शन अगदीच कुचकामी ठरेल.

ग्रामोद्योगपत्रिका, जुलै १९४६

१६. लोकसेवकसंघ

[तारीख, २९ जानेवारी १९४८ रोजी म्हणजे, देहावसनापूर्वी एकच दिवस आधी, गांधीजींनी लोकसेवक संघासाठी करण्याच्या घटनेचा एक मसुदा तयार केला होता. हिंदी राष्ट्रीय सभेने आपले विसर्जन करून या लोकसेवक संघात आपले रूपांतर करावे अशी त्यांची इच्छा होती. या संघाचे सभासद होणाऱ्यांसाठी त्यांनी पुढील पात्रतानिदर्शक अटी घातल्या होत्या.]

१. प्रत्येक सेवक हा स्वतः काढलेल्या सुताची खादी किंवा ऑल इंडिया स्पिनर्स असोसिएशनने प्रमाणपत्र दिलेली खादी नेहमी वापरणारा असला पाहिजे; तसेच तो मद्यपान करणारा असू नये. जर तो हिंदू असेल तर त्याने अस्पृश्यतेचा कोणत्याही स्वरुपात अगर प्रकारात स्वतः किंवा

आपल्या कुटुंबात मागमूस ठेवलेला चालणार नाही. जाती-जातींतील एकतेवर त्याचा भरवसा पाहिजे, सर्व धर्मांविषयी त्याला समान आदरभाव असला पाहिजे. तसेच वंश, लिंग किंवा धर्म यांची कोणतीही आडकाठी न आणता सर्वांना समान संधी मिळावी अशी त्याची श्रद्धा असली पाहिजे.

२.त्याच्या हद्दीत येणाऱ्या प्रत्येक ग्रामस्थाशी त्याचा वैयक्तिक परिचय असला पाहिजे.

३. ग्रामस्थांची एक यादी ठेवून त्यांच्यामधील कार्यकर्ते नोंदून ठेवून त्यांना त्याने तयार केले पाहिजे.

४. आपल्या स्वत:च्या कामकाजाची दैनंदिनी त्याने ठेवली पाहिजे.

५. शेती व ग्रामोद्योग यांच्यामार्फत गावांना स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण करण्यासाठी त्याने गावांची संघटना बांधली पाहिजे.

६. ग्रामस्थांना स्वच्छता व आरोग्य यांचे शिक्षण त्याने दिले पाहिजे आणि रोगराई व दुखणी टाळण्याकरिता त्याने उपाययोजना केली पाहिजे.

७. नई तालीम म्हणजे नवशिक्षणाच्या दिशेने त्याने ग्रामस्थांच्या शिक्षणासाठी, त्यांच्या जन्मापासून मृत्युपर्यंत, संघटना करीत राहिले पाहिजे. हिंदुस्तानी तालिमी संघाने याबाबतीत घालून दिलेल्या धोरणाला अनुसरून त्याचे हे काम चालले पाहिजे.

हरिजन, १५-२-१९४८

१७. समग्र ग्रामसेवा

समग्र ग्रामसेवकाला गावात राहणाऱ्या प्रत्येक माणसाची ओळख असली पाहिजे आणि त्याला शक्य असेल ती हरेक प्रकारची मदत त्याने सर्वांना केली पाहिजे. याचा अर्थ असा नव्हे की त्याला एकट्याला सर्व काही करता येईल. स्वावलंबी कसे व्हावे याबद्दलचे मार्गदर्शन तो ग्रामस्थांना करील आणि त्यांना लागणारी मदत व माल तो मिळवून देईल. तो आपल्या मदतनिसांना शिकवून तयार करील. तो त्यांची मने अशा

रीतीने जिंकेल की ते आपणहून त्याला सल्ला विचारतील आणि तो अनुसरतील. समजा मी एका गावात तेलघाणा घेऊन जाऊन राहिलो तर मी एक दरमहा पंधरा वीस रुपये मिळवणारा तेली होऊन राहणार नाही. मी एक महात्मा घाणावाला होईन. महात्मा शब्द मी येथे सहज गमतीने वापरला आहे, परंतु माझ्या म्हणण्याचा अर्थ असा की तेली म्हणूनच मी असा एक नमुनेदार गाववाला होईन की त्यांनी माझे अनुकरण करावे. गीता आणि कुराण समजणारा असा तेली मी असेन. माझी विद्वत्ता निदान इतकी असेल की गाववाल्यांच्या मुलांना मला शिकविता येईल. वेळ नसल्यामुळे मला कदाचित ते करता येणार नाही. गाववाले माझ्याकडे येतील आणि मला म्हणतील, 'मेहेरबानी करून आमच्या मुलांच्या शिकण्याची काहीतरी व्यवस्था करा.' मी मग त्यांना म्हणेन, 'मी तुमच्याकरिता शिक्षकाची व्यवस्था करतो, पण त्याचा खर्च तुम्हाला द्यावा लागेल.' आणि ते मोठ्या खुशीने तो खर्च सोसावयाला तयार होतील. मी त्यांना सूत कातावयास शिकवीन आणि ते जेव्हा माझ्याकडे येऊन एक विणकर पाहून द्या असे म्हणतील तेव्हा ज्या शर्तीवर मी त्यांना शिक्षक मिळवून दिला त्याच शर्तीवर त्यांना एक कोष्टी बघून देईन. तो कोष्टी त्यांना आपले स्वत:चे कापड कसे विणावे ते शिकवील. मी त्यांच्या मनावर स्वच्छतेचे व आरोग्याचे महत्त्व बिंबवीन आणि ते जेव्हा मला म्हणतील की, 'आम्हाला एक झाडूवाला बघून द्या' तेव्हा मी त्यांना सांगेन, 'मीच तुमचा झाडूवाला आहे आणि मी तुम्हा सर्वांना भंगीकाम शिकवतो.' समग्र ग्रामसेवकाची माझी जी काही कल्पना आहे, ती अशी आहे.

हरिजन, १७-३-१९४६

गावांतील तट

मोठी उद्वेगाची व खेदाची गोष्ट आहे की या हिंदुस्तान देशात शहरांमध्ये जसे पक्षभेद व तट आहेत, तसेच ते खेडेगावांतदेखील आढळून येतात. आणि सत्तेचे राजकारण जेव्हा खेड्यांत शिरते तेव्हा ते

खेड्यांतील लोकांचे हित करण्याच्या विचारांऐवजी आपल्या पक्षातील लोकांची सत्ता कशी अधिक वाढेल याच विचाराने येते. आणि मग ग्रामस्थांना त्याची मदत होण्याऐवजी ते एक विघ्नच होऊन बसते. मी असे म्हणेन की याचा परिणाम काहीही असो, आपण शक्य तितका स्थानिक मदतीचा उपयोग करून सत्तेच्या कलंकापासून मुक्त राहिलो तर आपली फारशी फसगत होणार नाही. आपण हे ध्यानात ठेवले पाहिजे, शहरांतील इंग्रजी शिकलेल्या स्त्री-पुरुषांनी देशाच्या पाठीचा केवळ कणाच असलेल्या खेड्यांची अक्षम्य हयगय केली आहे. आपण केलेल्या या दुर्लक्षाचे स्मरण केले म्हणजे आपल्या अंगी सोशिकपणा येईल. एक तरी प्रामाणिक कार्यकर्ता नाही असे एकही खेडे अजून माझ्या पाहण्यात नाही. आपल्या खेडेगावांत काहीतरी गुणवत्ता आहे हे ओळखण्याइतकी नम्रता जर आपल्या ठिकाणी असेल तर असा प्रामाणिक कार्यकर्ता आपल्याला सापडेल. मात्र स्थानिक राजकारणातून आपण आपली वाट अगदी सरळपणे काढली पाहिजे. हेही करणे आपल्याला साधेल, मात्र आपण सर्वच पक्षांची व पक्षहीनांची मदत, जर ती चांगली असेल तर घेतली पाहिजे. प्रमुख कार्यकर्त्याला मी असे स्वच्छपणे सांगेन, जर तुम्हाला काही बाहेरची मदत मिळत असेल तर ती घेणे टाळा. एकाकीच काम करा, धैर्याने काम करा, हुशारीने काम करा आणि ते फक्त स्थानिक मदत घेऊनच करा. जर या कामी तुम्हाला यश आले नाही तर दुसऱ्या कोणा व्यक्तीला अगर स्थितीला दोष देण्याऐवजी स्वत:वर तो दोष घ्या.

हरिजन, २-३-१९४७

१८. गावांतील शांतिदले

काही दिवसांपूर्वी माझ्या सांगण्यावरून शांतिदले स्थापन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु त्यातून काही निष्पन्न झाले नाही. तथापि त्यापासून एक धडा मिळाला आणि तो म्हणजे या दलाचे स्वरूपच असे आहे की त्यांच्या सदस्यांची संख्या फार मोठी असणार नाही. साधारणपणे कोणत्याही स्वयंसेवक पथकांबद्दल, जर शक्तीचा उपयोग हाच त्यांचा पाया असेल, तर शिस्तीचा भंग झाला म्हणजे शक्तीचा वापर म्हणजे दंड, शिक्षा वगैरे आलीच. अशा संघटनांमध्ये सभासदाचे चारित्र्य अथवा शीलसंपन्नता कशी आहे यावर भर दिला जात नाही. शारीरिक मजबुती हीच मुख्य गोष्ट धरली जाते. परंतु अहिंसक संघटनांमध्ये उलट परिस्थिती असली पाहिजे; तेथे शीलसंपन्नता किंवा चारित्र्य यालाच मुख्य महत्त्व आहे आणि शरीरसंपदेला दुय्यम स्थान आहे. अशी पुष्कळ माणसे मिळणे कठीण असते. म्हणूनच अहिंसक पथके ती कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने लहानच असली पाहिजेत. अशी पथके सर्वत्र पसरलेली असावीत. प्रत्येक खेड्यात अथवा मोहल्ल्यात एक-एक पथक असावे. त्याच्या सदस्यांचा परस्परांशी चांगला परिचय असला पाहिजे. प्रत्येक पथकाने आपला प्रमुख निवडावा. सगळ्या सदस्यांचा दर्जा एकच असणार, परंतु सगळे जेव्हा एकच प्रकारचे काम करतात, तेव्हा एकाच्या शिस्तीखाली ते काम चालले पाहिजे. नाही तर त्या कामाची हानी होईल. जेथे दोन किंवा अधिक पथके असतील, तेथे त्यांच्या पुढाऱ्यांनी एकमेकांशी विचारविनिमय केला पाहिजे. आणि कार्याची एकच दिशा ठरविली पाहिजे. या मार्गानेच यशाची खात्री लाभेल.

अशा तऱ्हेने जर अहिंसक स्वयंसेवक पथके स्थापन झाली तर त्यांना कोणतीही कटकट मिटविता येईल. आखाड्यांमध्ये शरीरबल संवर्धनाचे दिले जाणारे सर्व शिक्षण या दलांना लागणार नाही, परंतु त्यातील काही

द्यावे लागेल. एक गोष्ट मात्र अशा संघटनांच्या सर्व सदस्यांना साधारण आहे आणि ती म्हणजे ईश्वरावर दृढ श्रद्धा. तोच आपला खरा मित्र व कर्ताकरविता आहे. त्याच्यावर भरवसा असल्याखेरीज या शांतिसेना निष्प्राण होतील. ईश्वराला नाव कोणतेही असो, प्रत्येकाने हे लक्षात घेतले पाहिजे की त्याच्याच सामर्थ्याने प्रत्येक जण काही करू शकेल. असा इसम दुसऱ्याचा प्राण कधीच घेणार नाही. जरूर पडली तर तो स्वत: मरायला तयार होईल आणि अशा रीतीने मृत्यूवरच विजय मिळवून चिरंजीव होईल.

ज्या मनुष्याच्या मनावर हा नियम उत्तम प्रकारे ठसलेला आहे आणि त्याचे परिपालन करणे हा ज्याच्या जीवनाचाच भाग झालेला आहे, तो मनुष्य त्याला आपोआप उपजत बुद्धीनेच कसे वागावे हे कळेल. तथापि हे सगळे म्हटल्यानंतरही माझ्या स्वत:च्या अनुभवावरून मी जे काही नियम बसविले आहेत, त्यांतले काही येथे देतो:

१. स्वयंसेवकाने आपल्याजवळ कोणतेही शस्त्र बाळगू नये.

२. पथकाचे सदस्य सहज ओळखता येण्याजोगे असावेत.

३. प्रत्येक स्वयंसेवकाजवळ जखमा वगैरे बांधण्याचे साहित्य, कातर, सुई-दोरा, शस्त्रवैद्याचा चाकू वगैरे सामान, प्राथमिक स्वरूपाचे उपचार करता येण्यासाठी सदैव असले पाहिजे.

४. जखमी किंवा घायाळ माणसांना उचलून सुरक्षितपणे नेण्याचे ज्ञान स्वयंसेवकाला असले पाहिजे.

५. आग कशी विझवावी, आग लागलेल्या स्थळी स्वत:ला भाजून न घेता कसे शिरावे, उंचावर माणसे सोडविण्याकरिता कसे चढावे व उतरावे याचे ज्ञान हवे. ज्यांना सोडवावयाचे त्यांचा भार वाहूनही उतरावे लागते.

६. आळी-मोहल्ल्यांतील सर्व माणसांशी स्वयंसेवकाची ओळखदेख असली पाहिजे. अशी जानपहचान ही सुद्धा एक सेवाच आहे.

७. आपल्या हृदयात स्वयंसेवकाने सदोदीत रामनामाचा जप करावा आणि आपणासारखीच श्रद्धा असणाऱ्यांनाही सदैव तसे करण्याविषयी विनवावे.

माणूस ईश्वराचे नाव पुष्कळदा केवळ पोपटपंचीप्रमाणे घेतो आणि त्यापासून फलाची आशा ठेवतो. खऱ्या साधकाची श्रद्धा सजीव असली म्हणजे पोपटासारखा जप करण्यातील अनृत निघून जाईल, इतकेच नाही तर इतरांच्या अंत:करणातील असले अनृतदेखील त्यामुळे हद्दपार होईल.

हरिजन, ५-५-१९४६

***